cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–६८ | गुरूवार, दि.०३ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पुरवणी मागण्यांचा पूर !

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी दोन्ही सभागृहांत ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या सादर केल्या. या मागण्यांवर पुढील आठवड्यात ७ आणि ८ जुलै रोजी चर्चा होऊन त्या मंजूर केल्या जातील. २०२५–२६ च्या पुरवणी मागण्यांत नाशिकमध्ये होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि अंमलबजावणी खर्चासाठी १ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रस्ते, मेट्रो, सिंचनासह विविध पायाभूत प्रकल्पांसाठी पुरवणी मागण्या उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळात सादर केल्या.

### दहशतवादी पाक आता संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचा अध्यक्ष

मुंबई : अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प आणि चीनच्या जीवावर माजलेल्या पाकिस्तानमुळे भारताची आता डोकेदुखी वाढली आहे. यावेळी त्याला निमित्त म्हणजे संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद. संयुक्त राष्ट्राच्या सर्वात महत्त्वाचे अंग असलेल्या सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदी पाकिस्तानची निवड झाली आहे. १९३ पैकी १८२ देशांचा पाठिंबा मिळवून पाकिस्तान या पदावर विराजमान झाला. दहशतवादाला पोसणारा पाकिस्तानच संयुक्त राष्ट्रामध्ये आता महत्त्वाच्या स्थानावर गेल्यामुळे भारताची मात्र डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदाची सूत्रे मंगळवार दि. १ जुलै रोजी हाती घेतली आहेत.

# व्यापाऱ्याकडून बांधावर होणारी शेतकऱ्यांची लूट थांबणार !

## परवानाधारक व्यापाऱ्यांनाच बांधावर जाऊन शेतमाल खरेदीची परवानगी

### ● कृषी उत्पन्न बाजार समितीचीही घ्यावी लागेल संमती

मुंबई । प्रतिनिधी

बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणे अडचणीचे होत आहे. यामधून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे प्रकार राज्यात निदर्शनास येत आहेत. त्यामुळे यापुढे बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीचा परवाना बंधनकारक करण्यात येणार आहे. परवाना असलेल्या व्यापाऱ्यांनाच संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात बांधावर जाऊन शेतमाल खरेदीची परवानगी देण्यात येईल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य दौलत दरोडा यांनी प्रश्न उपस्थित केला होता.



या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मंत्री जयकुमार रावल म्हणाले, अकोला जिल्ह्यातील अंदुरा ॲग्रो प्रोड्सर कंपनीने (ता. बाळापूर) शेतकऱ्यांचा सोयाबीन शेतमाल खरेदी केला. खरेदी केलेला शेतमाल वखार महामंडळाच्या गोदामात ठेवण्यात आला. वखार महामंडळाच्या गोदामातील पावत्या आणि खरेदी केलेल्या शेतमालामध्ये १,२९७ क्विंटलची तफावत आढळून आली आहे. याबाबत कंपनीचे मालक व अन्य ११ लोकांवरती गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तफावतीचे पैसे शेतकऱ्यांना देण्यासाठी कंपनीचा बाजार समितीकडून देय असलेला ३६ लाख रुपयांचा निधी अडकविण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे पैसे तातडीने देण्यासाठी वसुलीची कार्यवाही ◀◀ पान २ वर

# आमदाराचा बनावट आवाज काढत बीडच्या चौघांकडून रत्नागिरी प्रशासनाची फसवणूक!

## बोगस सहीचे लेटरपॅड देत ३ कोटी २० लाख रुपयांचा निधी हडपला, आ.लाड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल

मुंबई । प्रतिनिधी

भाजप आ.प्रसाद लाड यांच्या नावाचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर करत ३ कोटी २० लाख रुपयांचा निधी हडपण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. रत्नागिरी येथील अधिकाऱ्यांना आमदार लाड यांच्या बनावट लेटरहेडवर खोटी सही आणि एआय–निर्मित आवाजाद्वारे फसवणूक करत हा निधी वर्ग करण्यात आला. स्वत: लाड यांनी विधान परिषद सभागृहात हा प्रकार उघड केल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.




मंगळवारी संध्याकाळी ४:३० वाजता रत्नागिरी येथील एका अधिकाऱ्याला एआय–निर्मित कॉल आला, ज्यामध्ये प्रसाद लाड यांच्या आवाजात निधी तातडीने वर्ग करण्याचे आदेश देण्यात आले. यासाठी लाड यांच्या नावाचे बनावट लेटरहेड आणि खोटी सही असलेले पत्र वापरण्यात आले. या फसवणुकीनंतर ३ कोटी २० लाख रुपये बीड जिल्ह्यात वर्ग झाले. मात्र, रत्नागिरीच्या अधिकाऱ्याला संशय आल्याने त्यांनी लाड यांच्याशी थेट संपर्क साधला, तेव्हा हा घोटाळा उघडकीस आला. आमदाराच्या नावाचा गैरवापर करत कोट्यवधींची फसवणूक झाल्याने बीड पुन्हा प्रकाशझोतात आले आहे. ◀◀ पान २ वर

### » एआय चा दुरुपयोग

तंत्रज्ञानाचा वापर करून घडवलेला हा घोटाळा सायबर गुन्हेगारीच्या नव्या आव्हानाची जाणीव करून देतो. यापूर्वीही अशा प्रकारच्या फसवणुकीच्या घटना समोर आल्या असल्या, तरी आमदारासारख्या उच्चपदस्थ व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करणारा हा प्रकार चिंताजनक आहे. यामुळे सायबर सुरक्षेची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून लवकरच या घोटाळ्यामागील मुख्य सूत्रधारांना अटक होण्याची अपेक्षा आहे.

# शिवसेना पक्ष अन् धनुष्यबाण चिन्हावर १४ जुलै रोजी सुनावणी




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरुद्ध ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली आहे. सर्वोच्च न्यायालय या प्रकरणी पुढील सुनावणी १४ जुलै रोजी घेणार आहे.**

ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर हा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी या आठवड्यात अथवा पुढील आठवड्यात तत्काळ सूचिबद्ध करण्याची मागणी केली. दरम्यान, खंडपीठाने आंशिक न्यायालयीन कामकाजाच्या दिवसांत ही याचिका सूचीबद्ध करण्यास सहमती दर्शवली नाही. तर एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी असे सादर केले की, ७ मे रोजी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने तत्काळ सुनावणीची विनंती फेटाळून लावली होती. त्यावर, ठाकरे गटाची बाजू मांडणारे वकील कामत म्हणाले की न्यायमूर्ती कांत यांच्या खंडपीठाने न्यायालयीन सुट्टीत हा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी दिली होती. त्यानंतर खंडपीठाने १४ जुलै रोजी हे प्रकरण सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्याचे निश्चित केले. शिवसेनेत फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे गटाला देण्यात ◀◀ पान २ वर

## विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा अंदाज; कोकण, घाटमाथ्यावर पावसाचा जोर कायम राहणार

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील अनेक भागात मागील दोन दिवसांपासून पाऊस हजेरी लावत आहे. पुढील ५ दिवस राज्यात ठिकठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील काही भागात मात्र पावसाचा जोर कमीच राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

कोकणातील सर्वच जिल्ह्यांमध्ये पुढील ५ दिवस जोरदार पावसाचा अंदाज आहे. ◀◀ पान २ वर

## शेतकरी, मजूर आणि दिव्यांगांसाठी ठाकरे बंधूंनी एकत्र यावे–बच्चू कडू



नागपूर । प्रतिनिधी

राज्याची, मराठी माणसाची अस्मिता महत्वाची आहे. मात्र सर्वसामान्यांच्या पोटात भाकर नसेल तर तो जगणार कसा? शेतकरी, मजूर आणि दिव्यांगांसाठी ठाकरे बंधूंनी एकत्र यायला हवे, असे आवाहन प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी माध्यमांशी ◀◀ पान २ वर

## झाड तोडल्यास ५० हजार रुपयांच्या दंडाबाबत सरकारची माघार

मुंबई : झाड तोडल्यास ५० हजार रुपयांचा दंड आकारण्याचा निर्णय मागच्या सरकारने घेतला होता. तसा अध्यादेशही काढण्यात आला होता. मात्र सरकारने आज याबाबतचे विधेयक मागे घेतले. यावरून माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि विद्यमान वनमंत्री गणेश नाईक या भाजपाच्या आजी–माजी मंत्र्यांमध्ये विधानसभेत खडाजंगी झाली. एकनाथ शिंदे सरकारच्या काळात तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बेकायदेशीर वृक्षतोड रोखण्यासाठी ◀◀ पान २ वर

# पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून गडहिंग्लज प्रशासकीय इमारतीचा प्रश्न सुटला

## उपमुख्यमंत्री अजित पवार, पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत बैठक ; मंत्री हसन मुश्रीफ यांनी मानले पंकजाताईंचे आभार

मुंबई । प्रतिनिधी

गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) येथील उप विभागीय कार्यालयाच्या जागेचा प्रश्न अखेर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने मार्गी लागला आहे. उप मुख्यमंत्री अजित पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज झालेल्या बैठकीत पशुसंवर्धन विभागाने त्यांची ७५ आर जमीन यासाठी उपलब्ध करून दिली आहे. दरम्यान या नवीन इमारतीत पशुसंवर्धन विभागाचे देखील स्वतंत्र कार्यालय असणार आहे. दरम्यान मंत्री हसन मुश्रीफ यांनी याबद्दल ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली व ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज विधानभवनातील त्यांच्या समिती कक्षात कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी ◀◀ पान २ वर

# कृष्णा आंधळेला अटक करा; अन्यथा कठोर निर्णय घेणार

## धनंजय देशमुख यांचा इशारा

बीड। प्रतिनिधी

**सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणाला ६ महिने उलटून गेले. मात्र अद्याप या प्रकरणातला एक आरोपी कृष्णा आंधळे हा फरार आहे. त्याला तात्काळ अटक करा. त्याच्यापासून आमच्या जीवितास धोका आहे. त्याला अटक न केल्यास मी लवकरच कठोर निर्णय घेणार असल्याचे धनंजय देशमुख यांनी बुधवारी जाहीर केले.**

९ डिसेंबर २०२४ रोजी बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेनंतर वाल्मिक कराडसह



इतर आरोपी मकोका अंतर्गत अटकेत आहेत. या प्रकरणाला सहा महिने पूर्ण झाले असून, अजूनही कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे. बीडमध्ये सुनावणीच्या दिवशी न्यायालयाच्या परिसरात आरोपींचे समर्थक आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी हे पक्ष चिन्ह असलेल्या गाड्या मोठ्या संख्येने आणून वातावरण भयभीत करून कुटुंबावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. वेळोवेळी मागणी करून देखील सर्व आरोपी एकाच जेलमध्ये आहेत. ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११.५० क्विंटल | २,४८१ | २,६०१ | २,५३० |
| ज्वारी/हायब्रिड: ३९.०० क्विंटल | १,९०० | २,७५१ | २,४६६ |
| मका/लोकल:३.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : २१.५० क्विंटल | ६,५५० | ६,६७२ | ६,६३० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ४३.०० क्विंटल | १,९५० | २,७०० | २,३९० |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:१४.५० क्विंटल | ४,२०० | ४,२५० | ४,२१६ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,५०० | ५,९०० | ५,७०० |

# कपडे, भांडी, सायकल, स्टेशनरी, चप्पल स्वस्त होणार !

## केंद्र सरकार १२ टक्के जीएसटी स्लॅब रद्द करण्याच्या तयारीत




### हे होणार स्वस्त

टूथ पावडर, हिअर ऑईल, साबण (काही प्रकार). छत्र्या, शिवणयंत्र, स्वयंपाकासाठी वापरली जाणारी भांडी. इलेक्ट्रिक इस्त्री, वॉटर हीटर, लहान वॉशिंग मशीन. सायकली, अपंग व्यक्तींना उपयोगी गाड्या. रेडीमेड कपडे, चप्पल, विविध लस, डायग्नोस्टिक किट्स, स्टेशनरी, नकाशे, ग्लोब, रंगवायच्या वही, ग्लेझ्ड टाईल्स, रेडी–मिक्स काँक्रीट, प्रीफॅब इमारती, कृषी उपकरणे, सौर वॉटर हीटर, प्रक्रिया केलेले अन्न (काही प्रकार),

### तंबाखू, दारू, आलिशान गाड्या महाग

२०१७ मध्ये लागू झालेला कॉम्पेन्सेशन सेस मार्च २०२६ मध्ये संपुष्टात येणार आहे. त्याऐवजी आता केंद्र सरकारने हेल्थ सेस आणि क्लीन एनर्जी सेस लावण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. या बदलामुळे तंबाखू, सिगारेट्स, दारू, कार्बोनेटेड ड्रिंक्स आणि आलिशान गाड्या महाग होण्याची शक्यता आहे. हेल्थ सेस हे सेस आरोग्यास अपायकारक मानल्या जाणाऱ्या वस्तूंवर लागू होईल, ज्यामध्ये तंबाखूजन्य उत्पादने, सिगारेट्स, दारू आणि साखरेच्या शीतपेयांचा समावेश आहे. या सर्व वस्तूंवर आधीपासूनच २८ टक्के जीएसटी लागतो; आता या वस्तूंवर अतिरिक्त हेल्थ सेस लावण्यात येणार आहे.

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्र सरकारने यंदाच्या आर्थिक वर्षात इनकम टॅक्समध्ये सवलती दिल्यानंतर आता मध्यम व गरीब वर्गासाठी जीएसटीमध्ये दिलासा देण्याची तयारी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सरकार १२ टक्के जीएसटी स्लॅब पूर्णपणे हटवण्याचा किंवा या स्लॅबमधील अनेक वस्तूंना थेट ५ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये आणण्याचा विचार करत आहे. ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पुरवणी मागण्यांचा पूर !

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी दोन्ही सभागृहांत ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या सादर केल्या. या मागण्यांवर पुढील आठवड्यात ७ आणि ८ जुलै रोजी चर्चा होऊन त्या मंजूर केल्या जातील. २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांत नाशिकमध्ये होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि अंमलबजावणी खर्चासाठी १ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रस्ते, मेट्रो, सिंचनासह विविध पायाभूत प्रकल्पांसाठी पुरवणी मागण्या उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळात सादर केल्या. यात सर्वाधिक ११ हजार ४२ कोटी ७६ लाख रुपये अनुदानासाठी खर्च करण्यात येणार आहेत. या सुमारे साडेसत्तावन हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांमुळे राज्यावर ४० हजार ६६४ कोटी ६९ लाख रुपयांचा भार पडणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट आदेश दिलेले असतानाही राज्य सरकारच्या अर्थ विभागाने सोमवारी विधिमंडळात सादर केलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये शक्तिपीठ महामार्गाच्या जमीन संपादनासाठी एक रुपयाचीही आर्थिक तरतूद केलेली नाही. सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमुळे राज्याच्या तिजोरीवर ४० हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. सध्या राज्य सरकारवर ९ लाख कोटींपेक्षा अधिक कर्ज आहे.

मुख्यमंत्र्यांनी नुकताच एका बैठकीत पायाभूत प्रकल्पांचा आढावा घेतला होता. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाला शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन संपादनाकरिता २० हजार कोटींची तरतूद करण्याचे आदेश दिले होते. हा सहापदरी ग्रीन फील्ड महामार्ग नागपूर ते गोवा सीमेवरील पात्रादेवीपर्यंत असेल व त्याची लांबी ८०२ कि.मी. राहणार आहे. या प्रकल्पाला सोलापूर, लातूर, धाराशिव आणि परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून तीव्र विरोध होत आहे. स्थानिक शेतकऱ्यांचे जमीन सर्वेक्षणाच्या वेळी शासकीय अधिकाऱ्यांशी वाद झडत आहेत. तरीही अलिकडे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महामार्गाच्या आराखड्यासह भूसंपादनासाठी २०,७८७ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांपैकी १९ हजार १८३ कोटी ८५ लाख रुपये अनिवार्य, तर ३४ हजार ६६१ कोटी ३४ लाख रुपये कार्यक्रमांतर्गत आणि ३ हजार ६६४ कोटी ५२ लाख रुपये केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागण्या आहेत. राज्याच्या वाढत्या वित्तीय आणि महसूल तुटी तसेच सार्वजनिक कर्जाच्या भारामुळे निधीच्या उपलब्धतेवर मर्यादा असल्याच्या पार्श्वभूमीवर या मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. मार्च महिन्यात पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अजित पवार यांनी ६,४८०.२० कोटी रुपयांच्या अनुपूरक मागण्या मांडल्या होत्या. सोमवारी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांत ३ हजार २२८ कोटी ३८ लाख रुपये हे मेट्रो प्रकल्प, महापालिका, नगरपालिका, नगर परिषद, जिल्हा परिषदा यांच्या मुद्रांक शुल्क अधिभार परताव्यापोटीचे आहेत. राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोनसाठी २ हजार १८२ कोटी ६९ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणी, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच दुर्बल, वंचित समाज घटकांच्या विकासासाठी या निधीचा वापर करण्यात येणार आहे. महिला व बालविकास विभागासाठी २,६६५.७६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम 'लाडकी बहीण योजना' आणि इतर योजनांतर्गत पात्र महिलांना मासिक हप्त्याचे वेळेवर वितरण करण्यासाठी वापरण्यात येणार आहे.

नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि आसपासच्या परिसरात कुंभमेळा व संबंधित उपक्रमांचे नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी प्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद या विधेयकात आहे. मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर ४ जून २०२४ रोजी या प्राधिकरणासाठी अध्यादेश काढण्यात आला होता. एक मंत्री समितीही स्थापन करण्यात येईल. सिंहस्थ कुंभमेळ्याची सुरुवात ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी त्र्यंबकेश्वर व नाशिकमधील रामकुंड येथे 'ध्वजारोहण' सोहळ्याने होईल. २४ जुलै २०२८ रोजी ध्वज उतरवून या १२ वर्षांनी येणाऱ्या महोत्सवाचा समारोप होईल. कुंभमेळ्यात कोट्यवधी भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

# दिव्यांग, ज्येष्ठांना खा.बजरंग सोनवणेंमुळे मिळणार आधार

## जिल्ह्यात १८ जुलैपासून कृत्रिम साहित्याचे वाटप, पंचायत समिती स्तरावर शिबिरांचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

**दिव्यांग बांधवांना सहानुभूती नव्हे, तर भक्कम साथ देऊया!, या उदात्त दृष्टीकोनातून खा.बजरंग सोनवणे यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संपुर्ण बीड लोकसभा मतदार संघामध्ये दिव्यांग व्यक्तींना व ज्येष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य/साधने वाटप करण्यात येणार आहे. दि.१८ जुलैपासून हे शिबीर पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येत आहे.**

बीड लोकसभा मतदारसंघातील तालुक्यांमध्ये भव्य पूर्व तपासणी व नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. या शिबिरांचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव, विविध सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना राष्ट्रीय वयोश्री योजने अंतर्गत मोफत सहाय्यक उपकरणे प्रदान करणे हा आहे. एलिम्को, मुंबई या केंद्र शासनाच्या अधिकृत संस्थेच्या माध्यमातून, १८ जुलै ते ३० जुलै २०२५ या कालावधीत बीड लोकसभा मतदार संघात ही विशेष शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमध्ये पात्र लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी, नोंदणी प्रक्रिया आणि आवश्यकतेनुसार तात्काळ मोफत कृत्रिम अवयवांचे वाटप केले जाईल. हा उपक्रम दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एक मोठा दिलासा ठरणार आहे. या माध्यमातून त्यांना आत्मनिर्भर होण्यास आणि दैनंदिन जीवन सुलभ करण्यास मदत मिळेल. बीड लोकसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिरांमध्ये सहभागी होऊन या योजनेचा लाभ घ्यावा. जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांपर्यंत गावचे प्रमूख म्हणून सरपंच आणि गावातील तरूणांनी ही माहिती द्यावी, जेणे करून त्यांना या शिबीराचा लाभ होईल. तालुकानिहाय दिव्यांग दूत शाळाः केजः मतिमंद निवासी विद्यालय, उमरी मुकबधीर निवासी विद्यालय, उमरी अस्थिव्यंग निवासी विद्यालय, केज. अंबाजोगाई: ज्ञानवर्धिनी मूकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई योधवर्धिनी मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई अहिल्यादेवी मुकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई ज्ञानसागर कर्णबधीर निवासी विद्यालय, जवळगाव सेवा मतिमंद कार्यशाळा, धानोरा. बीड: आर्युमर्गलम निवासी मुकबधीर विद्यालय, बीड प्रज्ञाचक्षु निवासी अंध विद्यालय, बीड रुख्माई गोविंद मतिमंद निवासी विद्यालय, पांगरी रोड बीड मतिमंद निवासी विद्यालय, वासनवाडी अनिवासी मुकबधीर विद्यालय, वासनवाडी. माजलगांव: मतिमंद निवासी विद्यालय, माजलगांव मुकबधीर निवासी विद्यालय, माजलगांव मतिमंद निवासी विद्यालय, किट्टीआडगाव मुकबधीर नियासी विद्यालय, किट्टीआडगाव. पाटोदा: मुकबधीर निवासी विद्यालय, तांबाराजुरी मतिमंद निवासी विद्यालय, तांबाराजूरी, मतिमंद निवासी विद्यालय, दासखेड. वडवणी: साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय, नाथापुर मतिमंद निवासी विद्यालय, संभाजी नगर बीड अस्थिव्यंग निवासी विद्यालय, नेकनुर मुकबधीर निवासी विद्यालय, नेकनूर. आष्टी: छत्रपती शाहू महाराज मुकबधीर निवासी विद्यालय, आष्टी छत्रपती शाहू महाराज अस्थिव्यंग निवासी विद्यालय, आष्टी श्रेया मतिमंद निवासी विद्यालय, कारखेल, धारूर: मतिमंद निवासी विद्यालय धारुर अस्थिव्यंग निवासी विद्यालय, धारुर मुकबधीर निवासी विद्यालय, धारुर मतिमंद निवासी विद्यालय, बीड रोड धारुर. परळी: मानवविकास मुकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई मानवविकास मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई मानवविकास अस्थिव्यंग निवासी विद्यालय, अंबाजोगाई मुकबधीर निवासी विद्यालय, परळी कर्तव्य मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई मतिमंद निवासी विद्यालय, शिरुर: मतिमंद निवासी विद्यालय शिरूर, अस्थिव्यंग निवासी विद्यालय तळेगाव, ता.बीड. गेवराई: अस्थिव्यंग निवासी विद्यालय, तळेगाव ता. जि.बीड के.केशवरावजी धांडे मतिमंद निवासी विद्यालय, तलवाडा ता.गेवराई मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई प्रौढ मतिमंद निवासी कार्यशाळा, तलवाडा

### बीडीओ असतील नोडल अधिकारी

"पुर्व तपासणी शिबीरासाठी संबंधीत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना दिव्यांग नोडल अधिकारी म्हणुन काम करावयाचे आहे. सदर पूर्व तपासणी शिबीरासाठी बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील कर्मचारी यांना दिव्यांग दूत म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे. मुख्याध्यापक यांच्या नियंत्रणाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे दिव्यांग दूत म्हणून काम करतील.

### शिबीर कधी व कोठे?

| तालुका | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| केज | १८ जुलै | पंचायत समिती |
| अंबाजोगाई | १९ जुलै | पंचायत समिती |
| बीड | २१ जुलै | पंचायत समिती |
| माजलगाव | २२ जुलै | पंचायत समिती |
| पाटोदा | २३ जुलै | पंचायत समिती |
| वडवणी | २४ जुलै | पंचायत समिती |
| आष्टी | २५ जुलै | पंचायत समिती |
| धारूर | २६ जुलै | पंचायत समिती |
| परळी | २८ जुलै | पंचायत समिती |
| शिरूर | २९ जुलै | पंचायत समिती |
| गेवराई | ३० जुलै | पंचायत समिती |

# पिस्टल, जिवंत काडतुसांसह आरोपी जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हयातील अवैध शस्त्रे गावठी पिस्टल बाळगणा-या इसमांची माहिती घेऊन त्यांचा शोध घेणे कामी विशेष मोहीम राबवणे संदर्भात मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांचे सुचनेवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव सो यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करुन त्या बाबत सुचना देऊन मार्गदर्शन केल्याने सदरचे पथक हे जिल्हयातील अवैध शस्वे गावठी पिस्टल बाळगणा-या इसमांची माहीती घेत असतांना गोपनीय खबऱ्यांमार्फत माहिती मिळाली की,महेश निचळ रा. शिंदे वडगाव ता. घनसावंगी जि. जालना हा पानेवाडी ते राजेगाव रोडने कमरेला पिस्टल लाऊन तो फिरत आहे अशी माहीती प्राप्त झाल्याने सदरची माहिती वरिष्ठांना कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी पानेवाडी ते राजेगाव रोडवर पानेवाडी शिवारात रस्त्याने संशयास्पद एक इसम मिळून आला त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव महेश विष्णु निचळ असे असल्याचे सांगीतले खात्री झाल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यात व कब्जात त्याचे कमरेला खोवलेली एक गावठी पिस्टल व ०६ जिवंत काडतूस मिळुन आल्याने सदर आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे घनसावंगी येथे कलम ३/२५ आर्म ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार प्रभाकर वाघ, देविदास भोजने, इर्शाद पटेल, सागर बाविस्कर, संदिप चिंचोले, दत्ता वाघुंडे, सोपान क्षिरसागर, धीरज भोसले, योगेश सहाने, चालक अशोक जाधवर यांनी केली आहे.

# अंमळनेर पोलीस ठाण्यातील स.फौजदार विठ्ठल वारे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

अंमळनेर पोलीस ठाण्यातील सहाय्यक फौजदार (चालक) तथा शिरूर तालुक्यातील पांगरी (मारुतीची) येथील रहिवासी विठ्ठल नारायण वारे हे नियत वयोमानानुसार दिनांक ३० जून २०२५ रोजी ३२ वर्षे निष्कलंक यशस्वी पणे सेवा करून सेवानिवृत्त झाले.या निमित्त पोलीस स्टेशन अंमळनेर यांच्या वतीने सेवापूर्ती गौरव सोहळा दि.१ जुलै २०२५ रोजी मोठ्या थाटामाटात व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला.त्यांचा यावेळी सपत्नीक मान्यवर व प्रमुखपाहूण्यांच्या हस्ते पूर्ण पोशाख व संसार उपयोगी भांडी देऊन शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून पी.एस.आय.कृष्णा चव्हाण,रमेश वारे (सरपंच पांगरी),सुभाष घोळवे (सरपंच घोळेवाडी),उपसरपंच ज्ञानेश्वर वारे,अशोक दहिफळे आदींची उपस्थिती होती.यावेळी सहायक पोलीस निरीक्षक सपकाळ, पी.एस. आय.चव्हाण, पोलीस हवालदार जालिंदर बनसोडे तसेच रमेश वारे,अशोक दहिफळे सुभाष घोळवे, मुख्याध्यापक सोनवणे सर, डी.बी.विघ्ने सर, शाम दहिफळे, ज्ञानेश्वर दहिफळे सर, पो. ह.भागवत बिक्कड यांनी गौरवपूर्ण भाषणे करून मनोगत व्यक्त केले.यावेळी वक्त्यांनी भाषणातून सेवानिवृत्त विठ्ठल वारे यांच्या ३२ वर्ष सेवेत मुंबई,केज, पाटोदा,अंमळनेर या ठिकाणी यशस्वीपणे राबविलेल्या कार्याला उजाळा देऊन श्री.वारे यांचा सर्वांनी आदर्श घेऊन शासकीय सेवा यशस्वीपणे पूर्ण करण्याचे मार्गदर्शन केले.वारे यांचे संपूर्ण कुटुंब धार्मिक वृत्तीचे आहे.त्यांना समोर कोणीही व्यक्ति भेटली तर ते त्यांना रामकृष्ण हरी या नामघोषानेच बोलण्यास सुरुवात करणार हा त्यांचा स्वभाव आहे.त्यामुळे त्यांना परिसरात रामकृष्ण हरी या नावानेच ओळखतात.यावेळी सत्काराला उत्तर देताना वारे म्हणाले की,प्रत्येकाने ज्या त्या क्षेत्रात काम करताना प्रामाणिक पणे व निस्वार्थीपणे सेवा करून जीवनात ईश्वराची सेवा करून परमार्थ करावा म्हणजे संसारात काहीही कमी पडत नाही.या कार्यक्रमाला सुरेश वारे, केंद्रप्रमुख चंद्रकांत उकांडे तसेच पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,नितीन पवार सह सचिन वारे, बबन दहिफळे,विशाल वारे,अजिनाथ वारे,बाबासाहेब सोनवणे,पांडूरंग भालेकर,बबन वारे,महादेव बेदरे, महारूद्र वारे अंमळनेर पोलीस ठाण्याचे पो.ह.बबन शिंदे,साईनाथ जाधव,ज्ञानेश्वर डोंगरे,मारुती मेहत्रे, संदीप सांगळे,पो.कॉ.योगेश बहिरवाळ,गणेश गोसावी,भारत राठोड,शाम खाडे तसेच श्री.वारे यांचे नातेवाईक,मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्रप्रमुख उकांडे सर यांनी केले.



## पान १ वरून...

### व्यापाऱ्यांकडून बांधावर होणारी

करण्यात येत आहे. पुढे बोलताना जयकुमार रावल म्हणाले की, शेतीशी संबंधित शेतकऱ्यांचे फसवणुकीचे गुन्हे कमी करण्यासाठी 'कृषी गुन्हे शाखा' आणि कृषी न्यायालय स्थापन करण्याबाबत शासन सकारात्मक आहे. यावर्षीच्या हंगामासाठी सोयाबीन खरेदी केंद्र वाढविण्याबाबत शासन सकारात्मक आहे. मागील वर्षात राज्यामध्ये देशातील सर्वाधिक ११ लाख २१ हजार क्विंटल सोयाबीन खरेदीचा उच्चांक करण्यात आला. या वर्षी सुद्धा हाच प्रयत्न राहणार असल्याचेही यावेळी सांगितले. प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य भास्कर जाधव, नाना पटोले, कैलास पाटील, सुधीर मुनगंटीवार, रोहित पवार, रणधीर सावरकर, असलम शेख, श्रीमती सुलभा खोडके यांनीही सहभाग घेतला.

----------

### शिवसेना पक्ष अन् धनुष्यबाण

आले होते. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरुद्ध शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. त्यावर आता १४ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.

-----------

### आमदाराचा बनावट आवाज काढत बीडच्या

या प्रकरणात चार जणांची नावे समोर आली असून त्यापैकी एक बंडू नावाचा सरपंच असल्याची प्राथमिक माहिती आहे. आ. प्रसाद लाड यांनी या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ''माझ्या नावाचा आणि आवाजाचा गैरवापर करून हा घोटाळा घडवण्यात आला आहे. बनावट लेटरहेड आणि सहीचा वापर करत निधी चोरण्याचे कृत्य अत्यंत गंभीर आहे,'' असे त्यांनी सभागृहात सांगितले. याबाबत त्यांनी सायन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलीस आयुक्त आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही याची माहिती दिली आहे. ''बीडचे नाव ऐकताच मी अधिक सावध झालो,'' असेही लाड यांनी नमूद केले. दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी तपास सुरू केला असून चार संशयितांची नावे समोर आली आहेत. यापैकी एका संशयिताचे नाव बंडू असून तो सरपंच असल्याची माहिती आहे. पोलिसांनी संबंधित फोन नंबरचा मागोवा घेतला असून लवकरच या घोटाळ्यामागील सूत्रधारांचा शोध लागण्याची शक्यता आहे.

-----------

### शेतकरी, मजूर आणि दिव्यांगांसाठी

बोलताना केले. अलीकडेच हिंदी सक्तीविरोधात मराठी भाषेसाठी आंदोलनात्मक पवित्रा घेतल्याने आणि राज्य सरकारच्या भूमिकेमुळे यश मिळाल्याने मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना नेते उद्धव ठाकरे एकत्र येत असल्याची चर्चा जोरात सुरु आहे. या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी ठाकरे बंधूंनी शेतकरी, शेतमजूर आणि दिव्यांगासाठी एकत्रित यावे अशी भूमिका व्यक्त केली. हिंदी सक्तीविरोधी आंदोलनासाठी ठाकरे बंधू एकत्रित आले तर यश मिळेल. आज मराठी शेतकरी, शेतमजुरांचा प्रश्न गंभीर आहे. जगण्याचा, पोटापाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे. याकडे त्यांनी लक्ष वेधले. माय मराठीच्या हितासाठी उभे राहणाऱ्या ठाकरे बंधूंनी आता मायबाप शेतकऱ्यांच्या हक्कासाठीदेखील आमच्यासोबत आवाज उठवायला हवा, असेही बच्चू कडू यांनी नुकतेच म्हटले होते. असाच महाराष्ट्र एकवटला तर ही धरणीमाय न्यायाचा आनंद अनुभवू शकेल, असे आशा त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, बच्चू कडू यांनी सरकारला शेतकरी कर्जमाफीसाठी २ ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली आहे. २ ऑक्टोबरपर्यंत सरकारने निर्णय घ्यावा, अन्यथा मंत्रालयात घुसल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

-----------

### विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा अंदाज; कोकण,

सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा, पुणे आणि नाशिक जिल्ह्याच्या घाटमाथ्यावरही जोरदार पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यांच्या इतर भागात मात्र हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. सांगली, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातही काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर कमीच राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये पुढील ५ दिवस काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. आज छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, नागपूर, गोंदीया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. उद्या आणि परवा विदर्भातील जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर कमी राहणार आहे. तर शनिवारपासून पुन्हा विदर्भात पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

--------

### झाड तोडल्यास ५० हजार रुपयांच्या दंडाबाबत

१ हजाराचा दंड ५० हजर रुपये केला होता. मात्र मुनगंटीवार यांच्या कार्यकाळातील हा निर्णय आता मागे घेण्यात आला आहे. अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर करणारे विधेयक आज मागे घेण्यात आले. सुधीर मुनगंटीवार यांनी याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. विधेयक का मागे घेतले जात आहे हे मला माहीत नाही. जगात ग्लोबल वार्मिंगचा प्रश्न आहे, प्रत्येक गावामध्ये झाड तोडण्याची एक प्रकारची स्पर्धा सुरू आहे. सध्याच्या निर्णयानुसार झाड तोडता येत नाही असे नाही, फक्त परवानगी घ्यावी लागते. पण, मंत्री महोदय हे विधेयक मागे घेण्यासाठी का सांगत आहेत? असा सवाल सुधीर मुनगंटीवार यांनी केला. त्यांनी आपल्याच सरकारच्या भूमिकेला तीव्र विरोध केला.

-----------

### कृष्णा आंधळेला अटक करा;

त्यांना वेगवेगळ्या जेलमध्ये पाठवावे. असे न झाल्यास मी कठोर निर्णय घेणार असून त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल असा इशारा धनंजय देशमुख यांनी दिला. लवकरच मी कठोर निर्णय घेणार आहे. फरार आरोपी कृष्णा आंधळेला अटक करा ही आमची वारंवार मागणी आहे. जेल प्रशासनातील मागील काही दिवसांपासून दिली जाणारी व्हीआयपी ट्रीटमेंट बघता आरोपींना वेगवेगळ्या कारागृहात पाठवावे ही आमची मागणी होती. पण तसे काहीही झालेले नाही. असे सगळे असताना बीड कोर्टात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे चिन्ह असलेल्या गाड्या, पदाधिकारी, आरोपींचे समर्थन करणारे लोक मोठ्या प्रमाणात येत देशमुख कुटुंबावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. भीतीयुक्त वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. बाकी इतर कुठल्याही प्रकरणातील आरोपी जेरबंद होतात मात्र कृष्णा आंधळे २०४ दिवसांपासून फरार आहे. त्याच्यापासून आमच्या जीविताला धोका असल्याचे संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख म्हणाले आहेत.

----------

### पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून गहिंग्लज

पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,आमदार आशुतोष काळे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, पशुसंवर्धन विभागाचे सचिव रामास्वामी ए., पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (व्ही.सी.द्वारे) व अन्य संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज शहरामध्ये मध्यवर्ती ठिकाणी पशुसंवर्धन विभागाची ३.०६ एकर जागा आहे. त्यापैकी ०.७५ हे.आर. जागा पशुसंवर्धन विभागाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी तसेच पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचनेनुसार नवीन तालुका पशुसंवर्धन व दुग्धविकास उपायुक्त या कार्यालयासाठी स्वतंत्र मजला प्रस्तावित बांधकामांमध्ये समाविष्ट करावा, उर्वरित जागा पशुसंवर्धन विभागाकडे ठेवावी असा निर्णय बैठकीत झाला. गडहिंग्लज हे उपविभागीय कार्यालय असलेले शहर आहे. या ठिकाणी प्रांत कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता, सहकार, कृषी इत्यादी कार्यालय आहेत आणि ती सर्व भाड्याच्या जागेत आहेत. आता पशुसंवर्धन विभागाची उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्यामुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कार्यालयासाठी एकत्र प्रशासकीय इमारत बांधणे शक्य होणार आहे. त्यासाठी आवश्यक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

**मुश्रीफ यांनी मानले पंकजा मुंडेंचे आभार**

प्रशासकीय इमारतीला पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासूनचा हा प्रश्न आता मार्गी लागल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

---------

### कपडे, भांडी, सायकल, स्टेशनरी,

टूथपेस्ट, छत्र्या, शिवणयंत्र, प्रेशर कुकर, भांडी, विजेचे इस्त्री यंत्र, गिझर, लहान वॉशिंग मशिन, सायकली, रेडिमेड कपडे (१००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे), चप्पल (५०० ते १००० रुपयांच्या दरम्यानच्या किमतीच्या), स्टेशनरी, लसी, सिरेमिक टाईल्स, कृषी उपकरणे इत्यादींसारख्या अनेक वस्तू यामुळे स्वस्त होतील. या निर्णयामुळे सरकारवर ४० ते ५० हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार येईल, असे सुत्रांनी सांगितले. मात्र सरकार हा सुरुवातीचा भार सहन करण्यासाठी तयार असल्याचे संकेत मिळाले आहेत. किंमती कमी झाल्याने खरेदीमध्ये वाढ होईल, परिणामी आर्थिक उलाढाल वाढेल आणि जीएसटी संकलन दीर्घकालीन पातळीवर वाढेल, असा सरकारचा विश्वास आहे. मात्र, केंद्र सरकारच्या या प्रयत्नांना सर्व राज्यांचा पाठिंबा मिळेल असे सध्या तरी दिसत नाही. पंजाब, केरळ, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगाल यांनी याला विरोध दर्शवला आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. ०३ जुलै २०२५



## शेतकरी आहे अन्नदाता तोच आहे देशाचा खरा भाग्यविधाता वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांनी कृषी दिन साजरा केला

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत संलग्न सौ.के.एस.के.(काकू) कृषी महाविद्यालय बीड येथील चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक सलग्न उपक्रम अंतर्गत खामगाव येथे वृक्षारोपण करून कृषी दिन उत्साहात साजरा केला. यावेळी वसंतराव नाईक यांचे घोषवाक्य शेती हा व्यवसाय नसेल तर,स्वाभिमान शिल्लक राहणार नाही.या वाक्याचे महत्त्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले. शाळेतील मुख्याध्यापक आर. आर.गोस्वामी यांनी आपण कृषी दिन का साजरा करावा याचे महत्त्व सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ.जी.व्ही.साळुंखे तसेच कार्यक्रम अधिकारी चेअरमन भैय्या बुधनर, ग्रामपंचायत सदस्य रिजवान पठाण, नितीन कोपनर, रकमाजी बुधनर, शालेय समिती अध्यक्ष सिद्धेश्वर भावले, मुख्याध्यापक आर.आर.गोस्वामी व ए. बी. मोमीन ,प्रा. एस.पी. मोरे,प्रा. एस.टी.शिंदे व कार्यक्रम मार्गदर्शक एस.व्ही.राठोड व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण करण्यास सर्व ग्रामस्थांचे मोलाचे योगदान लाभले. कृषीदूत आकाश जाधव, विश्वनाथ गायके, सय्यद झहीर, रोहन जावळे, अमोल राठोड, गजानन घेनेकर, सानप गणेश यांनी कार्यक्रमाचे सुंदर असे आयोजन केले.

# हरित माजलगाव रोटरीच्या उपक्रमात तरुणाई सरसावली

### वाढदिवसाच्या निमित्ताने ॲड.भानुदास डक व आईच्या अमृत महोत्सवा निमित्त डॉ.चंद्रशेखर उजगरे यांनी केले वृक्षारोपण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलच्या 'हरित माजलगाव' या उपक्रमांतर्गत ३० जून २०२५ सोमवार रोजी छत्रपती संभाजी महाराज चौक येथे वकील संघांचे माजी अध्यक्ष ऍड.भानुदास डक यांनी वाढदिवसाच्या दिवसाच्या निमित्ताने तसेच डॉ. चंद्रशेखर उजगरे यांनी मातोश्री आयु. लिलाताई ज्ञानोबा उजगरे यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त आज ५१ झाडांचे वृक्षारोपण केले.



रोटरीच्या हरित माजलगाव या उपक्रमाची सुरुवात मागील वर्षी (सप्टेंबर २०२४) शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापासून झाली होती.शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे, चौक मार्गे छत्रपती संभाजी महाराज चौकापर्यंतच्या मुख्य मार्गावर सुमारे २०० मोठ्या झाडांचे वृक्षारोपण करण्याचे लक्ष्य रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलने घेतले होते.आजच्या कार्यक्रमानंतर हे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पूर्ण झाले असल्याचे रोटरी सचिव रो.प्रभाकर शेटे यांनी सांगितले.

या प्रसंगी रोटरी डिस्ट्रिक्ट उप प्रांतपाल डॉ.शंकर जुजगर,डॉ.यशवंत राजेभोसले,डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले, डॉ.चंद्रशेखर उजगरे,डॉ.सुनील गरड सह प्रोजेक्ट मॅनेजर रो.इम्रान नाईक यांच्यासह रोटरीचे अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.वृक्षारोपण कार्यक्रमात यावेळी रोटरीचे चार्टर अध्यक्ष डॉ.सुनील गरड,रो.माजी अध्यक्ष रो.गजेंद्र खोत,रो.विनोद जाधव,रो.कैलास येलशेटे,रो.सुनील शिंदे,रो.आनंद शिंदे,रो.कृष्णा सोळंके,रो. उमाकांत सोळंके,प्रा.कव्हाळे रो.प्रा.नीलकंठ साबळे यांचा सहभाग होता. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशांत शेटे,रमेश बाहेती आणि शेख अली पटेल बाबामिया देशमुख यांनी विशेष मेहनत घेतली.

रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचे सचिव रो.प्रभाकर शेटे यांनी सांगितले की, ''या मोहिमेसाठी भर उन्हाळ्यात टँकरने पाणी देण्यासाठी माजी नगरसेवक शरद यादव सह अनेक दात्यांचे योगदान मिळाले. त्यात नारायणराव डक,उद्योजक माधव निर्मळ व सुरेंद्र रेदासनी मित्र मंडळ,बसवेश्वर जयंती उत्सव समिती व वीरशैव तरुण मंडळ यांनी भरीव सहकार्य केले,हरित माजलगाव हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून शहराच्या पर्यावरण संवर्धनासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.नागरिकांनी पुढे येऊन या मोहिमेत सहभागी व्हावे,असे आवाहन यावेळी संयोजककडून करण्यात आले.

रोटरी क्लबने ''हरित माजलगाव'' हा चांगला व स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे त्यात आपलेही काही योगदान असावे म्हणून माझ्या वाढदिवसासाठी होणारा आवास्तव खर्च टाळून आमच्या कुटुंबाने माजलगाव न्यायालय परिसरात वृक्षारोपण केले व आज रोटरीच्या वृक्षारोपण उपक्रमात सहभाग घेतला शहरातील नागरिक अशा उपक्रमात सहभागी झाले तर शहरातील सौंदर्यात भर पडेल.

–ॲड.भानुदास डक (जेष्ठ विधिज्ञ माजलगाव)

माझी आई आयु. लीलाताई ज्ञानोबा उजगरे हिचे हे अमृत महोत्सवी वर्ष त्या निमित्ताने तिची इच्छा होती की सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करावे त्यामुळे आम्ही उजगरे कुटुंबियांनी आज रोटरी च्या हरित माजलगाव उपक्रमात सक्रिय सहभाग घेत वृक्षारोपण करून आईच्या अमृत महोत्सवी सोहळ्याचा एक वेगळा आनंद घेतला.

–डॉ. चंद्रशेखर उजगरे. माजलगाव.

हरित माजलगाव हा वृक्षवल्ली साठी महायज्ञ आहे शहरात मुख्य रस्त्यावर कुठेही झाड दिसत नव्हते त्या मुळे रोटरी ने पुढाकार घेऊन मुख्य रस्त्यावर मोठया प्रमाणात झाडे लावण्याचा दृढ संकल्प केला त्यासाठी अनेक दाते पुढे आले डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून पुढे छ.संभाजी महाराज चौका पर्यंत वृक्षारोपण करणे त्याचे ट्री गार्ड सह संरक्षण व वर्षभर पाणी देऊन संगोपन मोठे आव्हान होते. पण ही सर्व झाडें सर्वांच्या परिश्रमाने जगली वाचली आणि दिमाखाने उभी राहिली आज संभाजी महाराज चौकापर्यंतचा हा टप्पा पूर्ण झाला रोटरी संकल्प पूर्ण झाला असला तरी हरित माजलगाव साठी हा यज्ञ पुढे चालूच असणार आहे त्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

–रो. प्रभाकर शेटे (सचिव )रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल.

## हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कामखेडा येथे वृक्षारोपण

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) (काकू) कृषी महाविद्यालय बीड येथील कृषीदुतांनी मौजे कामखेडा येथे महाराष्ट्र कृषी दिनानिमित आणि महाराष्ट्र राज्याचे माजी मुखमंत्री व हरित क्रांतीचे प्रणेते यांच्या जयंती निमित्त कृषीदुतांकडून कामखेडा गावामध्ये आती उत्साहमध्ये वृक्षदिंडी व वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या वृक्षरोपणाला देशी झाडांचा व शोभिवंत फुलझाडे याचा वापर करण्यात आला जसे की ,करंज, चिंच,जांभूळ , लिंबूनी,सदाफुली इत्यादी झाडांचा समावेश होता.या कार्यक्रमाला कामखेडा हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री आर. एस. कुऱ्हे सर, मंडळ अधिकारी काशीद सर, तलाठी मा.गणेश गायकवाड,तंटामुक्त अध्यक्ष राजूभाई शेख यांची प्रार्थनीय उपस्थिती लाभली. कार्यक्रमत यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कृषीदुतांना महाविद्यालयाचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक. डॉ. एस.टी. शिंदे व उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक एस.एस. राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी कृषीदूत व्यंकटेश कदम, युवराज खाडे, किशोर मलपुरे, योगेश कुटे, ऋत्विक सोन्नर, श्रीकृष्ण शिंदे, फारुक शेख हे उपस्थित होते.



## छोटेवाडीत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम आणि कृषी औद्योगिक सलग्नता उपक्रम हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांची जयंती व महाराष्ट्र कृषी दिन साजरा करण्यात आला.



हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या जयंतीनिमित्त गावातील परिसरात चिंच,आवळा,वड, अशोक, पारिजातक,लिंब या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.झाडांच्या संगोपनासाठी सर्वांनी संकल्प केला. यावेळी सरपंच अंगदराव कटके, ग्रामसेवक डि.के.ताटे, उपसरपंच बाळासाहेब चव्हाण,शालेय समितीचे अध्यक्ष विनोद दळवी, विद्यार्थी प्रदिप धनवडे,धनंजय लोंढे,गजानन अंडील,अजय मोरे, हरीश थावरे, विशाल थेटे, हनुमान जाधव, अमर भिसे ग्रामपंचायत सदस्य दत्ता इंगळे, वैजेनाथ कटके, दिलीप राठोड, शिवाजी कटके, सुग्रीव सोळंके, केरबा भांगे, युवराज आब्दल, राजाभाऊ राठोड, दगडू दादा सोळंके, पंडित राठोड, नितीन कटके,शरद दळवी,सत्यप्रेम चोरगे ,रामभाऊ राठोड,आश्रोबा चोरगे,शेषराव पंडित,अर्जुन धनवडे, वैभव माळेकर, बाळासाहेब कटके, बाळराजे इंगळे, गणेश राठोड, प्रवीण राठोड, अजित कटके, अमोल इंगळे, अभिमान इंगळे, राहुल मापाडे, जालिंदर सोळंके, एकनाथ माळेकर, भानुदास दळवी, योगेश धनवडे, सुखदेव राठोड यांची उपस्थिती होती.

# माणुसकी सेवा फाऊंडेशनच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी प्रकाश वेदपाठक

### सामाजिक बांधिलकी, प्रशासनात सुसंवाद आणि शेवटच्या घटकांसाठी संघर्षरत नेतृत्व

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) संलग्न माणुसकी सेवा फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी प्रकाश वेदपाठक यांची नियुक्ती नुकतीच करण्यात आली. सामाजिक कार्यात सक्रिय आणि ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची ही योग्य निवड असल्याचे सर्वत्र मानले जात आहे. वेदपाठक यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष, प्रवक्ते व माणुसकी सेवा फाऊंडेशनचे महाराष्ट्र अध्यक्ष महेश भाऊ शिंदे यांच्या हस्ते अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे प्रकाश वेदपाठक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महेशभाऊ शिंदे हे सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांचे विचार व धोरणे तळागाळात पोहोचविण्यासाठी महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाड्यात झंजावाती संवाद दौरे करीत आहेत. सामाजिक माध्यमातून प्रशासन, शासकीय योजना आणि विकासाचे मॉडेल ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचविणे, जनतेच्या अडचणी प्रशासनापर्यंत नेऊन त्या मार्गी लावणे, आणि सामान्य नागरिकाचे जीवनमान उंचाविण्यासाठी ते अहोरात्र झटत आहेत. माणुसकी सेवा फाऊंडेशन हे समाजासाठी समर्पित कार्य करणारे आहे. या दूरदृष्टीमुळेच माणुसकी सेवा फाऊंडेशनने प्रत्येक जिल्हा, तालुका व ग्रामीण पातळीवर शाखा स्थापनेचे अभियान हाती घेतले आहे. सामाजिक जाणीवा असलेले कार्यकर्ते, युवक व महिलांचा सक्रिय सहभाग यातून घडतो आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र केवळ सामाजिक मदतीपुरते न राहता शासकीय योजनांचे प्रबोधन, आरोग्य शिबिरे, शिक्षणवाढ, शेतकऱ्यांसाठी कृषी मार्गदर्शन, महिला व बालकल्याण, व्यसनमुक्ती, रोजगार निर्मिती यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर आधारित आहे. आपल्या निवडीबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलताना प्रकाश वेदपाठक यांनी सांगितले की, माझी ही नियुक्ती म्हणजे पदापेक्षा जबाबदारी ही मोठी आहे. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत शासनाच्या विविध योजना आणि न्याय पोहोचविणे हेच माझे ध्येय आहे. सन्माननीय महेश भाऊंनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी प्रत्यक्ष कामातून सिद्ध करीन, असे आश्वासन प्रकाश वेदपाठक यांनी आपल्या निवडीनंतर उपस्थितांशी संवाद साधताना व्यक्त केले. वेदपाठक यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यातून उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे. या निवडीनंतर अंकुश गंगावणे (बीड जिल्हाध्यक्ष), संजय तेलंग, सय्यद अमजद, प्रवीण सोळंके, शेख नासेर, रवी उबाळे, महेश वेदपाठक आदींसह अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रकाश वेदपाठक यांना शुभेच्छा देवून त्यांचे अभिनंदन केले.



प्रकाश वेदपाठक
(प्रदेश उपाध्यक्ष, माणुसकी सेवा फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य)

# संकल्प विद्या मंदिर शाळेचे विद्यार्थी नम्रता जोपासणारे – तहसीलदार विलास तरंगे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील प्रशांतनगर भागातील अल्पावधीत नांवारूपाला आलेले संकल्प विद्या मंदिर येथे विविध स्पर्धा परीक्षेमध्ये शिष्यवृत्ती प्राप्त, विविध मेडल्स प्राप्त, गुणवत्ता यादीमध्ये झळकलेल्यांसह एकूण १८० विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी आयोजित केला होता.

येथील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात शनिवार, दिनांक २८ जुन रोजी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार हे होते. तर यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार विलास तरंगे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, अधिव्याख्याता डॉ.योगेश सुरवसे, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक अनंतदादा लोमटे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.राजेंद्रप्रसाद धायगुडे, स्पर्धा परीक्षा समन्वयक संतोष राऊत यांची तर विचारमंचावर संस्थाध्यक्ष कैलास चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आर.एस.बडे यांची ही उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांनी प्रतिमापूजन केले. त्यानंतर शाळेच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रारंभी प्रास्ताविक करताना शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आर.एस.बडे यांनी स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेच्या वतीने स्कॉलरशिप टॅलेंट सर्च, ज्युनियर आयएएस, एमटीएस (जळगाव) यासह विविध परीक्षेसाठी विद्यार्थी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर बसतात. असे सांगून वर्षभर संस्था राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी परीक्षेमध्ये नाविन्यपूर्ण यश मिळवून चि.सोहम चव्हाण, चि.श्रेयश पौळ, कु.श्रेया चाटे, कु.श्रावणी कांगणे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले असून स्कॉलरशिप अवॉर्डसाठी प्राप्त चि.स्वरूप गणेश लाड तसेच विविध मेडल्स प्राप्त १८० हून अधिक विद्यार्थ्यांचा गुणगौरव यावेळी करण्यात आला.




**स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थी घडविणारी संकल्प विद्या मंदिर शाळा – गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार**

**आयडियल उपक्रम राबविणारे संकल्प विद्या मंदिर – सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले**

सुरूवातीला बोलताना ॲड.राजेंद्रप्रसाद धायगुडे यांनी पालक व विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. संकल्प विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संस्थाचालक यांचे कौतुक केले. प्रत्येक विद्यार्थ्याने सातत्यपूर्ण अभ्यास करून आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करावे, व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तर डॉ.योगेश सुरवसे यांनी बोलत असताना बीड जिल्ह्यात संकल्प विद्या मंदिर शाळा ही शिक्षण क्षेत्रात अल्पावधीतच नांवारूपाला आलेली शाळा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना व पालकांना जुनी शिक्षण पद्धत व आताची शिक्षण पद्धत समजून सांगितले व पालकांसाठी अनमोल असे मार्गदर्शन केले. तर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी संकल्प विद्या मंदिर ही आयडियल उपक्रम राबविणारी शाळा असल्याचे सांगत स्पर्धा परीक्षा संदर्भात सातत्यपूर्ण सहकार्य करण्यासाठी आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोत असा शब्द दिला. नेहमीप्रमाणेच त्यांनी विविध उदाहरणे देत, महामानवांचे संदेश, संदर्भ व त्यांच्या कार्याचे दाखले देत विद्यार्थी आणि उपस्थित पालकांशी दिलखुलास संवाद साधला. व अतिशय मौलिक असे मार्गदर्शन केले. डॉ.इंगोले यांच्या समायोचित मार्गदर्शनामुळे सभागृह मंत्रमुग्ध झाले होते. याप्रसंगी तहसीलदार विलास तरंगे यांनी ही संकल्प विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद पाहून मनाला समाधान वाटले असे नमूद केले. या शाळेत शिकणारे विद्यार्थी व त्यांचे पालक नशिबवान आहेत. तर ज्यांचा प्रवास खडतर परिस्थितीतून सुरू झाला आहे अशा व्यक्तींच्या कार्यक्रमाला मी आवर्जून उपस्थित असतो. त्यामुळे मला या चोले दाम्पत्याचा व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक वाटते. कारण ३५ विद्यार्थ्यांपासून सुरू केलेला प्रवास हा सोपा नसतो. हे यश शिक्षकांचे सातत्यपूर्ण योगदान व विद्यार्थ्यांचे परीश्रम यामुळे हे संपादन करता आले. विद्यार्थ्यांनो खूप खेळा, खूप शिका व अभ्यास करा. आनंदी रहा असे आवाहन तहसीलदार तरंगे यांनी केले. यावेळी माता, पिता पालक, विद्यार्थी यांची लक्षणीय उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सई फड, प्रगती केंद्रे ,अक्षरा निकम, भक्ती गायकवाड या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षिका श्रीमती पी.एच.नायक यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्रीमती कौशल्या शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संकल्प विद्या मंदिर शाळेचे शाळेचे सर्व शिक्षक, कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीताने करण्यात आली. तर सांगता पसायदानाने झाली.

पान ६ वरून...

### माजी मुख्यमंत्री वसंतराव

विषयी शेतकऱ्यांना संबोधित केले.या कार्यक्रमात सन २०२४ -२५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध पीक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.डोंगरे सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला शिवाजी शिंदे, उद्यान पंडित, अण्णासाहेब जगताप,वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी उपस्थित होते सदरील कार्यक्रमाला कृषी विभागातील आणि पंचायत समिती येथील अधिकारी,कर्मचारी तसेच कृषी सखी आणि शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी केले व आभार डी. एल.गडपाळे कृषी अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांनी मानले.

### रोटरी क्लबचे रक्तदान

जुजगर,रो. दामोदर संदीकर,रो. राहुल लंगडे,रो. मधुकर घुबडे,रो. प्रभाकर साळेगावकर,रो. वर्षा सोळंके,रो. बाळासाहेब देशपांडे,रो.दीपक देशमुख,रो.संदीप गुंडेवार यांची या प्रसंगी उपस्थिती होती. माऊली हार्ट केअरचे कर्मचारी, श्रीसिद्धेश्वर भक्त मंडळ यांनी रक्तदान शिबिरास सहकार्य केले.

### स्टेट बँक ऑफ इंडिया

आहे.कोटनि प्रतिवादी बँकेचा युक्तिवाद ग्राह्य धरत दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी होऊ घातलेल्या धनगरवाडी पायतळवाडी येथील गट ६१ मधील जमिनीच्या लिलावास स्वतः दिलेला अंतरिम मनाई हुकूम रद्द करत दिनांक ०१ जुलै २०२५ ला आदेश पारित केला. त्यामुळे बँकेने सुटकेचा श्वास सोडला आता दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी होणारा लिलाव नियमित वेळेत होणार आहे.बँकेचे विधीज्ञ एडवोकेट संजय पोत्रेकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत

उसनवारी करून काही वेळा सावकाराकडून व्याजाने पैसे घेऊन पेरणी करावी लागते. परिसरातील पावसावर अवलंबून असलेल्या जमिनीत पेरण्या झाल्या. त्या मुरमाड,खडकाळ,माळरान जमिनीतील कोवळी पिके उन्हामुळे कोमेजून चालली आहेत.दुपारच्या वेळी पिके चक्क माना टाकीत आहेत. पाऊस येथून पुढे अशीच हुलकावणी देत राहिला तर भविष्यात खरीप हंगाम वाया जाऊन जनावरांच्या चाऱ्याचा,पाण्याचा प्रश्न निर्माण होऊन पशुधन जगवायचे कसे ही गंभीर समस्या शेतकऱ्यांना सतावणार आहे. एकीकडे पावसाने ओढ दिल्याचे संकट तर पिके जोमात आली तर त्यांना रानडुकरांचा त्रास त्यामुळे बळीराजा दुहेरी संकटाच्या कचाट्यात वाटचाल करीत आहे.मे महिन्यात अवकाळी झालेल्या पावसाने परिसरातील लहान-मोठे तलाव पाण्याने भरले व नदी नाल्यांना पूर येऊन पाणी वाहत आहे.सध्या तरी पाण्याची टंचाई दूर झाली पण खरीप पिकांसाठी पावसाची खूपच गरज आहे.

### आजाद समाज पार्टी माजलगाव

टाकणखार यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव विधानसभेची कार्यकारणी जाहिर करण्यात आली.यावेळी बीड जिल्हा महासचिव भीमराव सिरसट उपस्थित होते. रामेश्वर बडे यांची माजलगाव विधानसभा प्रभारी पदी नियुक्ती करण्यात आली तर माजलगाव विधानसभा अध्यक्ष पदी गोरख टाकणखार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच प्रदिप भालेराव विधानसभा उपाध्यक्ष, राजाभाऊ भिसे विधानसभा महासचिव,साधू साळवे विधानसभा सचिव,जिजाभाऊ वाघमारे यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली.या बैठकीचे प्रस्ताविक बाबासाहेब लांडगे यांनी केले तर सूत्रसंचलन अरविंद लोंढे यांनी केले.सदरील बैठकीसाठी महादेव आडागळे,श्याम थोरात,समशेर पठाण,शेख इमरान, सतिश कसबे, अविनाश घायाळ, दादाराव कोल्हे, खाशेब शेख,लखन सहराव,उमाकांत खोपे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.ही बैठक आनंदमय वातावरणात संपन्न झाली.

### सौ. के.एस.के. (काकू) कृषी

शिक्षक वृंद यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन अनंत कृषी विकास प्रतिष्ठान संस्थेचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंके, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. टी. शिंदे आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. पी. ढोरमारे यांनी केले. कार्यक्रमामध्ये कृषीदूत गणेश शिरसाट, विशाल शिंदे, माधव सानप, उजैर शेख, महावीर वाघमारे, निखिल वाघचौरे, वज्रा लक्ष्मण आदींचा सक्रिय सहभाग होता. हा उपक्रम पर्यावरण संवर्धनासाठी एक सकारात्मक पाऊल असून, विद्यार्थ्यांमध्ये वृक्षारोपणाविषयी जागरूकता निर्माण करणारा ठरला.

### एस.टी बसला छत्रपती

खूप वेळ वाया जातो. तरी पोस्टमास्टर यांनी वरीष्ठांना याबाबत त्वरित कळवावे आणि अंबाजोगाई पोस्ट ऑफिस कार्यालयात कांऊटरची संख्या व कर्मचारी वाढविण्यात यावेत. तसे न झाल्यास अंबाजोगाई पोस्ट ऑफिससमोर अंदोलन करण्यात येईल याची संपुर्ण जबाबादारी पोस्ट मास्टर यांच्यावर राहील. असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ऍड.शिवाजी कांबळे, अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर यांच्या स्वाक्षर्या आहेत.



## रोटरीने शेतामध्ये जाऊन राबणाऱ्या हातांचा केला सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेतीमध्ये अहोरात्र मेहनत करून काम करणाऱ्या ३० महिलांचा त्यांच्या शेतात जाऊन त्यांना सनकोट व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.हा उपक्रम रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने मंगळवारी तालुक्यातील वरवटी येथे राबविण्यात आला.

कृषी दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक,प्रकल्प प्रमुख डॉ. अल्का तडकलकर, सह प्रकल्प प्रमुख मंदाकिनी गित्ते,व रोटरीचे सदस्य वरवटी येथील शेतात गेले. तिथे शेतात काम करणाऱ्या महिलाना एकत्रित केले. त्यांना गुलाब पुष्प व शेतात काम करताना संरक्षण देणाऱ्या सनकोट चे वाटप ३० शेतकरी महिलाना करण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांनी गायलेल्या अभंगातून रोटरी प्रति कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी सरपंच चाटे, मुख्याध्यापक नेहरकर यांची उपस्थिती होती.शेतात राबणाऱ्या हातांचा सन्मान करत त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी आपण रोटरी क्लब च्या माध्यमातून ग्रामीण भागात विविध उपक्रम राबविणार असल्याचे रोटरीच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक यांनी यावेळी सांगितले.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि.३ जुलै २०२४
४

# ४०० मीटरच्या परिघात वीज कोसळण्याची पूर्वसूचना मिळणार

मंत्री महाजन यांच्याकडून ॲप विकसित करण्याची घोषणा; शेतकरी, शेत मजूर यांना संरक्षण

मुंबई : शेतकरी, शेतमजुरांसाठी ४०० मीटरच्या परिघात वीज कोसळण्याची पूर्वसूचना देणारं ॲप विकसित करण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती बुधवारी (दि.२) राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन यांनी दिली. राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासात वीज कोसळण्याची पूर्वसूचना देण्याची यंत्रणा विकसित करण्यासंदर्भात आमदार संतोष दानवे यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यावर मंत्री महाजन यांनी सभागृहात माहिती दिली.

नवीन ॲपबद्दल माहिती देताना गिरीष महाजन म्हणाले, ''वीज कोसळून शेतकरी आणि शेतमजुर मृत्यूमुखी पडतात. सध्या सचेत आणि दामिनी या दोन ॲपमधून ४० किलोमीटरच्या परिघात पडणाऱ्या विजेची पूर्व सूचना दिली जाते. परंतु आता ४०० मीटरमध्ये कोसळणाऱ्या विजेची पूर्वसूचना देण्यासाठी ॲप विकसित करण्याचं काम सुरू आहे.'' मंत्री महाजन यांच्या उत्तरावर काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी वीज पडून



मृत्यूमुख्यी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना वाढीव मदत द्यावी, अशी मागणी केली. तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी वीज कोसळून शेतकऱ्यांचं पशूधन दगावलं तर देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत वाढ करण्याची मागणी केली. मंत्री महाजन यांनी राज्यात गाई-म्हशीसाठी मदत देण्यात येत असल्याचं सांगितलं. ''वीज कोसळून मृत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना राज्य सरकार ४ लाख रुपये मदत देतं. गाय, म्हैस आणि बैल यासारख्या मोठ्या पशूधनासाठी ३७ हजार ५०० रुपये दिले जातात. तर शेळी मेंढीसाठी ४ हजार रुपये आणि कोंबडीसाठी १०० रुपये दिले जातात. कोंबडीसाठी १०० रुपयेच दिले जातात. ही मदत कमी आहे. त्यामुळे रक्कम वाढवून देण्याबद्दल विचार करू.'' असं महाजन म्हणाले. आमदार विजय वडेट्टीवार यांनी वाघाच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडल्यास २५ लाख आणि वीज कोसळून मृत्यूमुखी पडल्यास ५ लाख मदत देण्यात येते, हा फरक का करण्यात आला, असा प्रश्नही उपस्थित केला. तसेच वीज कोसळून मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना १० लाख रुपये मदत देण्याची मागणी केली. त्यावर विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी वीज कोसळणं नैसर्गिक आपत्ती आहे, तर वाघाचा हल्ला हा मानवी हस्तक्षेपामुळे आहे, असं म्हणत दोन्हीच्या आर्थिक मदतीत फरक राहणार असल्याचं सांगितलं.

## शेतकऱ्यांनो, कापसाच्या अधिक उत्पादनासाठी हे तंत्र वापरा



कापूस पीक हे देशातील महत्त्वाचे नगदी पीक असून लाखो शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह या पिकावर अवलंबून आहे. मात्र, अनेकदा कापसाच्या उत्पादनात सातत्याने घट होताना दिसते. यासाठी केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या सहकार्याने एक विशेष प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाचा उद्देश शेतकऱ्यांना कापूस उत्पादनवाढीसाठी आवश्यक आधुनिक, वैज्ञानिक आणि फायदेशीर तंत्रांची माहिती देणे हा आहे. या विशेष प्रकल्पाअंतर्गत नुकतीच शेतकऱ्यांसाठी प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना कापसाच्या उत्पादनात वाढ कशी साधता येईल, यासंबंधी प्रत्यक्ष शेतातच मार्गदर्शन करण्यात आले. कापसाच्या उत्पादनात घट होण्याची काही प्रमुख कारणे उघड झाली आहेत. यामध्ये अयोग्य जमीन निवड, वेळेवर अचूक खत व्यवस्थापन न करणे, अन्नद्रव्यांची कमतरता, कीड व रोगांचा प्रादुर्भाव, पाणी व्यवस्थापनाचा अभाव यांसारख्या बाबींचा समावेश आहे. त्यामुळे यावर उपाय म्हणून केंद्रामार्फत वैज्ञानिक पद्धतीने घन लागवड व अतिघन लागवड ही दोन प्रमुख तंत्रे शिफारस करण्यात आली आहेत.

रोपांतील अंतर : घन लागवड तंत्रज्ञानामध्ये मध्यम प्रकारच्या काळ्या जमिनीत २० ते ३० सेंमी अंतर ठेवून रोपे लावली जातात. यामध्ये दोन ओळींमध्ये ३ फूट अंतर आणि दोन झाडांमध्ये १ फूट अंतर ठेवण्याची सूचना आहे. यामुळे एकरी झाडांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते आणि प्रत्येक झाडाला आवश्यक पोषण, सूर्यप्रकाश मिळवून अधिक उत्पादन घेता येते. हलक्या प्रकारच्या जमिनीसाठी अतिघन लागवड तंत्र वापरण्यात येते. यात झाडांची संख्या अधिक असते, पण त्यांची वाढ नियंत्रित ठेवण्यासाठी 'दादा लाड' पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. या पद्धतीत झाडांची उंची, फांद्यांची संख्या नियंत्रित केली जाते, ज्यामुळे झाड पूर्णपणे बोंडनिर्मितीवर लक्ष केंद्रित करते. परिणामी, बोंडाचा आकार आणि वजन वाढते आणि एकरी उत्पादनात लक्षणीय वाढ होते. याशिवाय, झाडांची वाढ मर्यादित ठेवण्यासाठी विशेष वाढरोधक औषधांची वापर वेळोवेळी करणे आवश्यक असते. या औषधांची पहिली फवारणी लागवडीनंतर साधारणतः ४५ दिवसांनी, दुसरी ६५ दिवसांनी आणि गरजेनुसार तिसरी फवारणी ८५ ते ९० दिवसांनी करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले आहे. या पद्धतीत योग्य वेळी खतांचा समतोल वापर, वेळेवर निंदणी, तण नियंत्रण आणि पाण्याचे नियोजन हीही तितकीच महत्त्वाची बाब आहे.

## ऊस पिकावरील तांबेरा रोगाचे व्यवस्थापन

महाराष्ट्रामध्ये आडसाली हंगामासाठी लागवड केलेल्या सर्व प्रचलित जातींवर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असतो. अनुकूल वातावरणामुळे आडसाली उसामधील ऊस संख्या, कांड्याची लांबी व गोलाईवर या रोगाचा परिणाम होतो. साहजिकच ऊस उत्पादन व उत्पादकतेवर परिणाम दिसून येतो. लागवडीसाठी रोगग्रस्त बेण्याचा वापर, नियंत्रण उपाययोजनांचा वेळीच अवलंब न करणे यामुळे उसावरील रोगाचे प्रमाण वाढते. उसाचे हेक्टरी उत्पादन वाढविण्यासाठी तांबेरा रोगाचे सामूहिकरित्या प्रभावी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.



काय असतात तांबेरा रोगाचे लक्षण : उसाच्या पानावर तांबेरा हा रोग पुनक्सिनिया मिल्यानोसेफिला व पुक्सिनिया कुहिनीय या दोन बुरशींमुळे होतो. ही बुरशी फक्त ऊस पिकावर उपजीविका करते. आधी बुरशीचा प्रादुर्भाव पानांच्या दोन्ही बाजूस होऊन पानावर लहान, लांबट आकारांचे पिवळे ठिपके दिसतात. कालांतराने ठिपके लालसर तपकिरी होतात. ठिपक्यांचा भोवती फिकट पिवळसर हिरवी कडा तयार होते. पानांच्या खालच्या बाजूस ठिपक्यांच्या जागेवर उंचवटे तयार होतात. असे ठिपके फुटून नारंगी किंवा तांबूस तपकिरी रंगाचे बिजाणू बाहेर पडतात. हवेद्वारे हे बिजाणू विखुरले जाऊन रोगाचा मोठ्या प्रमाणात दुय्यम प्रसार होतो. रोगग्रस्त ठिपक्यांतील पेशी मरुन पाने करपतात. प्रकाश संश्लेषण क्रियेत येऊन उत्पादन घटते. साखर निर्मितीवर सुद्धा परिणाम होतो.

रोग वाढीस अनुकूल बाबी : सकाळचे धुके, दव व थंड वातावरण. बळी पडणाऱ्या जातींची मोठ्या प्रमाणात लागवड. नत्र खतांचा आडसाली उसाच्या जोमदार वाढीच्या अवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात वापरणे.

बुरशीचा जीवनक्रम व रोगाचा प्रसार : उसाच्या पानावर दवाच्या स्वरुपातील असलेले पाणी प्रामुख्याने रोगवाढीसाठी महत्त्वाचा व अनुकूल घटक आहे. पानावर ओलसरपणा असताना बिजाणू रुजून बुरशी तयार होते. ही बुरशी पानांच्या आंतरभागात प्रवेश करुन रोग निर्मिती करते. पानामध्ये रोगनिर्मिती प्रक्रिया सुरू झाल्यापासून ३ ते ४ दिवसांत पानावर लहान, लांबट आकारांचे पिवळे ठिपके दिसतात. दोन आठवड्यात नारंगी किंवा तांबूस तपकिरी रंगाचे बिजाणून बाहेर पडतात. रोगाचा जीवनक्रम १० ते १२ दिवस इतक्या कमी कालावधीत पूर्ण होतो. प्रामुख्याने या रोगाचा दुय्यम प्रसार हवेमार्फत व पाण्यामार्फत होतो. या रोगाचा प्रसार बेण्यामार्फत अगदी कमी प्रमाणात होतो.

व्यवस्थापन : ऊस पिकाचे सर्वक्षण करुन, रोगांची लक्षणे, तीव्रता व पिकाची अवस्था पाहून उपाययोजना कराव्यात. प्रतिबंधक शिफारशीत बुरशीनाशकाची फवारणी करावी. निरोगी बेणे मळ्यातील रोगमुक्त बेणे लागवडीसाठी वापरावे. रोगप्रतिकारक्षम जातीची (को ८६०३२) लागवड करावी. लागवडीसाठी रुंद सरी किंवा पट्टा पद्धतीचा अवलंब केल्यास उसामध्ये सूर्य प्रकाश व हवेचे प्रमाण वाढून रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. नत्राची मात्रा शिफारशीनुसार द्यावी. जास्त वापर झाल्यास रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.

नियंत्रण : जास्त प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर (फवारणी प्रति लिटर पाणी). मॅन्कोझेब ३ ग्रॅम अथवा टेब्युकोनॅझोल १ मि.ली. गरजेनुसार १० ते १५ दिवसांच्या अंतराने स्टिकरचा वापर करुन २-३ वेळा फवारणी करावी.

# लिंबूनीच्या झाडांना लीफ मायनर कीटकांचा धोका; ही आहेत लक्षणे

देशातील शेतकऱ्यांचा फळबागा लागवडीकडे कल वाढत चालला आहे. आधुनिकीकरणामुळे फळबागांमध्ये पहिल्या तंत्राच्या तुलनेत आता जास्त कष्ट करण्याची गरज भासत नाही. कारण आधुनिक यंत्रामुळे औषध फवारणी आणि मशागत करणे सोपे झाले आहे. आधुनिक यंत्राद्वारे ही कामे केली जात असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसाही वाचत आहे. खरे तर बागायती पिके ही शेतकऱ्यांसाठी नगदी पिके आहेत. त्यांची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. या भागात गेल्या काही वर्षांत लिंबूचे उत्पादन शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय झाले आहे. लिंबू हे शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. ज्याचे उत्पादन शेतकऱ्यांसाठी सोपे मानले जाते. परंतु, ते फायदेशीर करण्यासाठी, शेतकर्यांनी अनेक खबरदारी घेणे आवश्यक आहे. ज्यामध्ये लीफ मायनर कीटक शेतकऱ्यांसाठी लिंबू रोपासाठी आवश्यक आहे. तसे न केल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते.



हा कीटक फक्त लहान वनस्पतींमध्ये आढळतो : लिंबाची रोपटी लहान असताना त्या काळात लिंबूवर्गीय पानावरील किरकोळ लिंबूवर्गीय कीटक दिसून येतो. ते म्हणाले की, ही एक प्रमुख कीड असून मार्च ते नोव्हेंबरपर्यंत सक्रिय राहते. लिंबू, संत्रा आणि पोमेलो यांसारख्या लिंबूवर्गीय फळांच्या गटाचे ते नुकसान करते. लिंबूवर्गीय लीफमायनर अळ्या लिंबाच्या झाडांच्या कोवळ्या पानांमध्ये उथळ बोगदे किंवा खोबणी बनवून स्वतःला खातात. कीटक सामान्यतः संत्री, मँडरीन, लिंबू, पेपरमिंट्स, द्राक्षे आणि इतर वनस्पतींवर आढळतात. लिंबूवर्गीय लीफमायनर ही एकमेव खाण कीटक आहे. जे सहसा लिंबू (लिंबूवर्गीय) पानांवर हल्ला करतात.

या किडीची लक्षणे कशी ओळखावीत : लिंबूवर्गीय लीफमायनर हा एक अतिशय लहान, हलका रंगाचा कीटक आहे, जो १/४ इंचापेक्षा कमी लांबीचा आहे. यात तपकिरी आणि पांढर्या खुणा असलेले चांदीचे आणि पांढरे इंद्रधनुषी अग्रभाग आणि प्रत्येक पंखाच्या टोकावर एक वेगळा काळा डाग आहे. मागचे पंख आणि शरीर पांढरे असून मागचे पंख मार्जिनपासून पसरलेले आहेत. कीटकांच्या अळ्या फक्त लिंबाच्या पानांच्या खोडांमध्ये आणि इतर जवळच्या वनस्पतींमध्ये आढळतात, जसजशी अळी विकसित होते तसतसे ते पानाच्या पृष्ठभागावरून खाली वाहणाऱ्या शिरांच्या आत एक पातळ विष्ठा सोडते, एक पातळ रेषा म्हणून दिसते. ही विशेषता कीटक ओळखण्यात मदत करण्यासाठी वापरली जाते.

कीटक जीवन चक्र : लिंबूवर्गीय लीफमिनरच्या जीवनाच्या चार अवस्था असतात ज्यात अंडी, अळ्या, प्यूपा आणि प्रौढ कीटक यांचा समावेश होतो. प्रौढ वनस्पतींना हानी पोहोचवत नाहीत आणि फक्त १ ते २ आठवडे जगतात. प्रौढ पतंग पहाटे आणि संध्याकाळच्या वेळी सर्वात जास्त सक्रिय असतात आणि दिवसभर पानांच्या खालच्या बाजूला विश्रांती घेतात, परंतु क्वचितच दिसतात. प्युपल केस सोडल्यानंतर लगेच, मादी कीटक लैंगिक फेरोमोन उत्सर्जित करते जे नर कीटकांना आकर्षित करते. संभोगानंतर, मादी यजमान पानांच्या खालच्या बाजूला एकच अंडी घालते. झाडावर, फ्लश ग्रोथची नवीन उगवलेली पत्रके विशेषतः पसंतीची ओवीपोझिशन साइट आहेत.

किडींच्या हल्ल्यामुळे पाने सुकतात : लिंबूवर्गीय पानांची खाण लिंबूवर्गीय पिकांमध्ये अळ्या म्हणून जगू शकते. मोठी लोकसंख्या असल्याशिवाय, कडक झालेली जुनी पाने संवेदनाक्षम होत नाहीत. अळ्या नव्याने उगवलेल्या पानांच्या खालच्या किंवा वरच्या पृष्ठभागामध्ये प्रवेश करतात, ज्यामुळे ते वळण आणि विकृत होतात. या किडीचा प्रादुर्भाव झालेली पाने पिवळी पडतात, सुकतात आणि शेवटी फांद्यावर पडतात किंवा सुकतात. लिंबूवर्गीय कॅन्कर, जिवाणूजन्य रोगामुळे खाण दुखापती संसर्गाचे केंद्र म्हणून काम करतात.

लिंबूवर्गीय लीफमायनर किडीचे नियंत्रण : शेतकऱ्यांनी या किडीचा प्रादुर्भाव झालेली पाने गोळा करून नष्ट करावीत. पावसाळ्यात बाधित भागांची छाटणी करावी. वारंवार सिंचन आणि नायट्रोजन खतांचा जास्त वापर टाळा. अळ्या खाणीच्या आत असल्याने कीटकनाशकांच्या वापराने त्यांना सहज मारता येत नाही. तथापि, काही पद्धतशीर कीटकनाशकांच्या वापरामुळे संसर्ग काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६०८ : सॅम्यूअल बी. चॅम्पलेन यांनी कॅनडातील क्वेबेक शहराची स्थापना केली.
१६६१ : पोर्तुगीजांनी इंग्लंडचे राजा चार्ल्स द्वितीय यांना मुंबई व तंजौर बेट भेट दिले.
१७६० : मराठा सेनेने दिल्लीवर ताबा मिळविला.
१८५० : इस्ट इंडिया कंपनीच्या अध्यक्षांनी भारतातुन आणलेला 'कोहिनूर' हिरा इंग्लंडच्या राणीच्या स्वाधीन केला.
१८५२ : महात्मा फुले यांनी दलित मुलांसाठी पहिली शाळा काढली.
१८५५ : भारतात कायदे शिक्षणाचा प्रारंभ झाला.
१८८४ : डाऊ जोन्स हा निर्देशांक सुरू झाला.
१८८६ : जर्मनीच्या कार्ल बेन्झ याने जगातील पहिली मोटारगाडी बनवली.
१८९० : आयडाहो हे अमेरिकेचे ४३ वे राज्य बनले.
१९०८ : इंग्रज सरकारने लोकमान्य टिळकांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली.
१९२८ : लंडनमध्ये प्रथमतः रंगीत दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे प्रक्षेपण झाले.
१९३८ : 'मॅलार्ड' हे वाफेचे इंजिन ताशी १२६ मैल (२०२ कि. मी.) वेगाने न्यू कॅसलहून लंडनला पोहोचले. वाफेच्या इंजिनाचा हा वेगाचा विक्रम अजूनही अबाधित आहे.
१९७२ : भारत आणि पाकिस्तान देशांत काश्मीर संबंधी नि:शस्त्र करार झाला.
१९९८ : 'ए मेरे वतन के लोगो ' या प्रसिद्ध गाण्याचे कवी प्रदीप यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर
२००० : विक्रांत या विमानवाहू युद्धनौकेचे मुंबईच्या समुद्रात ऑयस्टर रॉकजवळ सागरी संग्रहालयात रुपांतर करण्यास नौदल, राज्यसरकार, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि मच्छिमार प्रतिनिधींनी मान्यता दिली.
२००१ : सुधीर फडके यांना राज्य सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
२००६ : एक्स. पी. १४ हा लघुग्रह पृथ्वीच्या अगदी जवळुन (साधारण चंद्राइतक्या अंतरावरुन) गेला.
२०१७ : अचल कुमार ज्योती यांची भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्त पदी निवड करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८३ : इंग्लिश कवी एडवर्ड यंग यांचे जन्म.
१८३८ : मामा परमानंद पत्रकार व विचारवंत, प्रार्थना समाजाचे एक संस्थापक (मृत्यू: १३ सप्टेंबर १८९३)
१८८६ : रामचंद्र दत्तात्रय तथा 'गुरूदेव' रानडे आधुनिक विद्याविभूषित तत्त्वज्ञ व संत, फर्ग्युसन व विलींग्डन महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक (मृत्यू: ६ जून १९५७)
१९०९ : बॅरिस्टर व्ही. एम. तथा 'भाऊसाहेब' तारकुंडे कायदेपंडित, स्वातंत्र्यसैनिक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयात सामाजिक समस्यांसाठी लढा देणारे झुंजार कायदेतज्ञ (मृत्यू: २२ मार्च २००४)
१९१२ : श्रीपाद गोविंद नेवरेकर मराठी रंगभूमीवरील लोकप्रिय गायक व नट (मृत्यू: १६ जून १९७७)
१९१४ : दत्तात्रय गणेश गोडसे इतिहासकार, नाटककार, कलादिग्दर्शक, वेशभूषाकार आणि नेपथ्यकार (मृत्यू: ५ जानेवारी १९९२)
१९१८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते व्ही. रंगारा राव यांचा जन्म. (मृत्यू: १८ जुलै १९७४)
१९२४ : सेलप्पन रामनाथन सिंगापूरचे ६ वे राष्ट्राध्यक्ष
१९२४ : तामीळवंशीय राजकारणी, सिंगापूरच्या प्रजासत्ताकाचे वे६ राष्ट्राध्यक्ष सेल्लप्पन रामनाथन यांचा जन्म.
१९२६ : सुनीता देशपांडे लेखिका व स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ७ नोव्हेंबर २००९)
१९५१ : सर रिचर्ड हॅडली न्यूझीलंडचे क्रिकेटपटू
१९५२ : भारतीय गायक अमित कुमार यांचा जन्म.
१९५२ : भारतीय कॅनेडियन लेखक रोहिनटन मिस्त्री यांचा जन्म.
१९७१ : विकीलीक्स चे संस्थापक ज्युलियन असांज यांचा जन्म.
१९७६ : हेन्री ओलोंगा झिम्बाब्वेचे क्रिकेटपटू
१९७७ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन माराठी गायक, संगीत नाटक-अभिनेते श्रीपाद गोविंद नेवरेकर यांचा जन्मदिन.
१९८० : हरभजनसिंग भारतीय क्रिकेटपटू
१९८७ : युवसेना जिल्हाअधिकारी जळगाव माननीय प्रितेश ठाकूर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : संत नामदेव यांनी समाधी घेतली. (जन्म: २९ आक्टोबर १२७०)
१९३३ : अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो य्रिगोयेन यांचे निधन. (जम: १२ जुलै १८५२)
१९३५ : सिट्रोएन कंपनीचे संस्थापक आंद्रे सीट्रोएन यांचे निधन. (जन्म: ५ फेब्रुवारी १८७८)
१९६९ : ब्रायन जोन्स 'द रोलिंग स्टोन्स'चे संस्थापक, गिटार, हार्मोनिका आणि पियानो वादक (जन्म: २८ फेब्रुवारी १९४२)
१९९६ : कुलभूषण पंडित तथा 'राजकुमार' ऊर्फ 'जानी' जबरदस्त आवाजाने संवादफेक करून प्रेक्षकांना खूष करणारा हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: ८ आक्टोबर १९२६)
१९९९ : परमवीर चक्र पुरस्कार सन्मानित गोरखा रायफल्सचे भारतीय सैन्य अधिकारी कॅप्टन मनोज कुमार पांडे यांचे निधन.
२०१५ : भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी (३६वे) सरन्यायाधीश योगेश कुमार सभरवाल यांचे निधन.

# लोकप्रतिनिधींनी कार्यकर्त्यांना वाटलेल्या कामाच्या रेवड्या

## लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या १८५ कामांचा ''श्रीगणेशा'' सुद्धा झाला नाही

## मराठवाड्यात २६२८ कामांना मंजुरी

## जिल्ह्यात सर्वाधिक १२१४ कामांचा समावेश तर १३३४ कामे कागदावर प्रगतिपथावर

बीड। प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विकासासाठी लोकप्रतिनिधी कामे सुचवित असतात.यात २५१५,१२३८ या योजनांमधून मराठवाड्यात गतवर्षी २६२८ कामांना मंजुरी मिळाली त्यातील १३३४ कामे कागदावर प्रगतीपथावर आहेत मात्र मंजुरीनंतर कामे पूर्ण करण्याकडे लोकप्रतिनिधी आणि कंत्राटदार दोघांनीही डोकावून पाहिले नाही त्यामुळे वर्षं उलटुनही मंजुर कामांपैकी १८५ कामांसाठी उद्घाटनाचा नारळ फोडलेला नाही त्यामुळे लोकप्रतिनिधींनी कार्यकर्त्यांना वाटलेल्या कामाच्या'' रेवड्या'' तशाच असुन मंजूर कामापैकी १८५ कामांचा ''श्रीगणेशा'' सुद्धा झालेला नसल्याचे आढळून आले आहे.आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पुन्हा या कामांच्या ''रेवड्या'' वाटल्या जाणार का? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे

**जिल्हा निहाय मंजुर कामे**

| | |
|---|---|
| बीड | १२१४ |
| परभणी | ५९९ |
| नांदेड. | ३७३ |
| संभाजीनगर | ३२९ |
| हिंगोली | ७९ |
| धाराशिव | २५ |
| जालना | ०० |

लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला असुन बीड जिल्ह्यात सर्वाधिक १२१४ कामांचा समावेश असुन मंजूर केलेली कामे वेळेत पूर्ण होताना दिसत नाहीत त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि कंत्राटदार यांनी मंजुर कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

१५१५ आणि १२३८ या हेडखाली मंजूर झालेल्या कामांचा निधी हा वित्त विभागाकडून टप्याटप्याने दिला जातो त्यामुळे वित्तमंत्री व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी यासाठी निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

**ग्रामीण भागातील विकासकामे :** गावातील अंतर्गत रस्ते आणि गटारांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन करणे, स्मशानभूमी आणि सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे, सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करणे आणि त्यांचे संरक्षण करणे, आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करणे,शिक्षण सुविधांमध्ये सुधारणा करणे. शहरातील अंतर्गत रस्ते आणि पदपथांची दुरूस्ती, कचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी प्रक्रिया, सार्वजनिक उद्याने आणि क्रिडांगणे विकसित करणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणे, पर्यटन स्थळांचा विकास करणे, महिला आणि बालविकासाची कामे.

ग्रामीण भागासह शहरी भागात २५१५,१२३८ या योजनूमधुन विविध विकास कामे मंजूर केली जात असतात.यासाठी लोकप्रतिनिधींकडुन या कामांच्या शिफारशी होत असतात.लोकप्रतिनिधींच्या शिफारशीनुसार मंजूर केलेली कामे पुढे वेळेत पूर्ण होताना मात्र दिसत नाहीत.या कामांमध्ये गावांतर्गत सिमेंट रस्ते,नाल्या, विद्युत पथदिवे, पेव्हर ब्लॉक आणि ईतर आवश्यक कामांचा समावेश असतो.बीड जिल्ह्यात तब्बल १२१४ कामे मंजूर करण्यात आली होती.तर मराठवाड्यात गतवर्षी २६२८ कामांना मंजुरी देण्यात आली होती. यापैकी १३३४ कामे कागदावर प्रगतीपथावर असल्याचे सांगितले जाते तर १८५ कामांच्या उद्घाटनाचे नारळ देखील फुटलेले नाहीत. कामाला मंजुरी मिळाल्यानंतर मात्र हेच कंत्राटदार कार्यकर्ते कामांकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत.



# महावीर चौकाचे व संयम कीर्ती स्तंभाचे लोकार्पण

अंबड। प्रतिनिधी

अंबड येथे आचार्य विद्यासागर महाराज यांचा ५८ व्या दीक्षा दिवसा निमित्ताने अंबड जालना रोडवर भव्य ३५ फुटांचे भगवान महावीर चौक व आचार्य विद्यासागर महाराज यांचे संयम कीर्ती स्तंभाचे लोकार्पण करण्यात आले. या पवित्र दिवशी संपूर्ण खाटीक समाजांनी आपली मांस विक्री ची दुकाने सुध्दा बंद ठेवली श्री भगवान महावीर मंदिर परिसरात अभिषेक पूजन व आचार्य विद्यासागर यांचे पूजन झाले या नंतर मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले.

मुनिश्री विरसागर महाराज यांचा द्वारे लिखीत भक्ती कैसे करे पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले नंतर मुनिश्री विरसागर महाराज यांचे प्रवचन झाले या प्रवनात आचार्य विद्यासागर महाराज यांचा जीवनातील अनेक प्रसंग सांगुन मुनिश्री ने त्यांचे कार्य सांगितले जसे जेलमधील कैदी व आदिवासी लोकांन साठी उघड्लेले हातकरघा जीव दये साठी गोशाळा मुलींचा शिक्षणासाठी प्रतिभास्थली इंडिया नही भारत बोलो भारतात हिंदी भाषेच महत्व इ कार्यक्रमासाठी जितेंद्र पापळकर विभागीय आयुक्त संभाजी नगर डॉ कल्याण काळे खासदार , राजेंद्र टोपे माजी आरोग्य मंत्री, देवीदास कुचे माजी नगराध्यक्ष ,विजय चव्हाण उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार, विभागीय पोलीस अधिकारी, मनोज उर्कीर्डे मुख्याधिकारी, भरतेश जी शहा उघोजक, अतुल जी शहा उघोजक , अनिल छाबड उघोजक ,अजित इंगलवार, उघोजक तसेच समाज बांधव मोठ्या संख्येने उप स्थित होते.

# मातृभूमी प्रतिष्ठान कडून मुख्याध्यापक कालिदास धपाटे सन्मानित



बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नामलगाव फाटा येथील लक्ष्मणराव जाहेर पाटील माध्यमिक विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक कालिदास धपाटे यांचा सेवापुर्ती सोहळा मंगळवार दि.१ जुलै २०२५ रोजी मराठवाडा शिक्षक संघ यांच्या वतीने यशवंत विद्यालय कॅनाल रोड , बीड येथे विविध सामाजिक ,शैक्षणिक समस्यावर तज्ञ व्यक्तींच्या सविस्तर मार्गदर्शनाने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. यावेळी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब नागरगोजे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक राजकुमार कदम, गणेश वाघ, दत्तात्रय चव्हाण, प्राचार्य डी जी तांदळे, उत्तमराव सानप, नामदेव चव्हाण, बाबा बडे, जे एम पैठणे, गणेश आजबे, युवराज मुरूमकर ,बीड शहर बचाव मंच चे अध्यक्ष नितीन जायभाये , लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे आदींसह बीड शहर बचाव मंच, लक्ष्मणराव जाहेर पाटील माध्यमिक विद्यालय व मराठवाडा शिक्षक संघाचे विविध पदाधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते .

# तहसिलदार विजय चव्हाण यांची बदली स्थगिती

अंबड। प्रतिनिधी

वाळू माफियांना वटणीवर आणणारे तसेच सर्वात जास्त महसूल शासनाला मिळवून देणारे अंबडचे कर्तदक्ष तहसीलदार विजय चव्हाण यांची अचानक बदली झाल्यामुळे त्यांची बदली अखेर स्थगिती मुळे रद्द करण्यात आली. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन आदेश क्र. बदली-२०२५/प्र.क्र.१५२/ई-३ मंत्रालय, मुंबई इथून दिनांक : ०१ जुलै, २०२५ रोजी बदली रद्द करण्यात आली. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील ४ (४) व ४(५) मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने श्री. विजय लक्ष्मण चव्हाण, तहसिलदार यांची दि.३०.०६.२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये तहसिलदार अंबड, जि. जालना या पदावरून अपर तहसिलदार छत्रपती संभाजीनगर या रिक्त पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आलेली आहे. आता सदरील ही बदली रद्द करण्यात येत आहे.तथापि, श्री. विजय लक्ष्मण चव्हाण, तहसिलदार यांची संदर्भाधीन आदेशान्वये अपर तहसिलदार छत्रपती संभाजीनगर या पदावर बदलीने करण्यात आलेल्या पदस्थापनेस प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने या आदेशाद्वारे पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात येत आहे. श्री. विजय चव्हाण, तहसिलदार हे पुढील आदेशापर्यंत तहसिलदार अंबड, जि. जालना या पदावर कायम राहतील महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने, मनिय जायभाये सह सचिव महाराष्ट्र शासनाकडून आदेश काढण्यात आले आहे. माहितीस्तव विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर तसेच जिल्हाधिकारी जालना यांना कळविण्यात येत आहे. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, विभागा मार्फत बदली स्थगिती आदेश देण्यात येत आहे

# शेती आणि मातीवर प्रेम करणारे मुख्यमंत्री वसंतराव नाईक - डॉ. भिमराव राठोड



पाटोदा। प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे शेती आणि मातीवर अतोनात प्रेम करणारे व्यक्ती होते, म्हणूनच त्यांना हरितक्रांतीचे जनक म्ह्णून आपण ओळखतो असे प्रतिपादन प्रा. डॉ. भीमराव राठोड यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १ जुलै रोजी वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली त्याप्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य आबासाहेब हांगे म्हणाले की महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतराव नाईक यांचा मोठा वाटा आहे. ते विकासाचे राजकारणी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. न. पु. काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मनीषा गाढवे यांनी केले तर आभार डॉ. लक्ष्मण गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# जिल्हाधिकारी कार्यालयात वसंतराव नाईक यांना अभिवादन

जालना । प्रतिनिधी

राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, तहसिलदार अनिल नव्हाते, नायब तहसिलदार सतिश तायडे, महसुल सहायक रविंद्र हेलगर, देवानंद डोईफोडे, अरुण डुकरे, दिपाली राऊत, संपदा कुलकर्णी, वैशाली डिघुळे तसेच प्रशासकीय इमारतीमधील विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# आदित्य कृषि महाविद्यालयाच्या कृषीदुतांकडून अंथरवन पिंपरी येथे कृषीदिनानिमित्त वृक्ष लागवड

बीड। प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषीदूत ,सुनील मदने, बाबासाहेब पल्हाळ, सचिन धुमाळ, गणेश ढोले, दयानंद सिरसट, योगेश मोरे, रेहान सय्यद, संदीप करडकर, श्रीदीप वळेकर, धीरज पवार, चैतन्य पाटील यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव २०२५-२६ अंतर्गत अंथरवन पिंपरी गावात ०१ जुलै रोजी कृषी दिन साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरून पिंपरी येथील विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने झाली. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांचे कृषी क्षेत्रातील क्रांतिकारी योगदान यांविषयी कृषीदुतांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर कृषी दिनाची पार्श्वभूमी, कृषी दिनाचे महत्त्व आणि कृषिप्रधान देशात कृषी दिन एक पावन पर्व म्हणून का ओळखला जातो या संदर्भात माहिती दिली. कृषी दिनानिमित्त कृषी दुतांकडून गावामध्ये वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषी दुतांनी गावकऱ्यांना वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले तसेच झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दिला. या कार्यक्रमासाठी अंथरवन पिंपरी गावचे सरपंच शिवगंगा भाऊराव प्रभाळे उपसरपंच अशोक बन्सीधर शिंदे कृषी सहाय्यक ज्योती शिंदे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरवन पिंपरी चे मुख्याध्यापक राजकुमार थोरात , इतर शिक्षक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

कृषी दूतांच्या या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य कल्याण अपेट, प्राचार्य श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वयक प्रा. वैभव शिंदे, कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय सातपुते व महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

# परळीतील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविकांची गर्दी

## नवीन भक्त निवास श्रावणात तत्काळ सुरू करा-ॲड. मनोज संकाये

परळी । प्रतिनिधी

परळी नगरीतील प्रभू श्री वैद्यनाथ हे देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असून, इथे दररोज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातून हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. विशेषतः श्रावण महिना सुरू होताच लाखो श्रद्धाळू परळीत दाखल होतात. यामुळे शहरात भाविकांची मोठी गर्दी निर्माण होते. मात्र, भाविकांच्या निवास व्यवस्थेचा प्रश्न कायम आहे. सध्या परळीत भाविकांसाठी पुरेशी निवास व्यवस्था उपलब्ध नसल्याने भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.हीच बाब लक्षात घेता, परळी नगरपालिका कार्यालयालगत तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत नव्याने बांधण्यात आलेले भक्त निवास सध्या पूर्णत्वास गेले आहे. हे भक्त निवास भवन, भाविकांच्या सेवेसाठी लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात यावे, अशी ठाम




मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात ॲड. मनोज संकाये यांनी नमूद केले की, ''श्रावण महिना सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. लाखो भाविक परळीत येणार आहेत. मात्र त्यांच्यासाठी योग्य निवासाची व्यवस्था नसेल, तर ही भाविकांसाठीच नव्हे तर परळीच्या यशाचीही शोकांतिका ठरेल. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ निर्णय घेऊन हे भक्त निवास कार्यान्वित करावे असे म्हटले आहे. भाविकांना निवासाची सुविधा उपलब्ध करून दिल्यास त्यांना मानसिक व शारीरिक आराम मिळेल, परळीतील तीर्थक्षेत्राचे महत्त्व अधिक वाढेल, भाविकांचा प्रवास अधिक समाधानकारक व सुरक्षित ठरेल, तसेच शहराच्या पर्यटन विकासालाही चालना मिळेल. अशा या गरजांच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने तातडीने पावले उचलून नव्याने बांधलेले भक्त निवास श्रावण महिन्यापूर्वीच भाविकांच्या सेवेसाठी खुले करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांच्यासह शिरीष सलगरे ,कैलास रिकीबे ,संतोष चौधरी ,प्रवीण रोडे ,राजू वायबसे ,संतोष कांबळे इतर मित्र मंडळाचे सदस्य पदाधिकारी उपस्थित होते

# पंढरपूर सेवेसाठी येणाऱ्या सर्व वाहक चालक एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन -परिवहन मंत्री

जालना। प्रतिनिधी

आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आभाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे.

या निमित्ताने माणसातील '' विठुराया'' ची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे. अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग नागरे बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेणार आहे. अशी पण माहिती अभिजीत भोसले जनसंपर्क अधिकारी मा. मंत्री परिवहन यांनी दिली आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र

गुरूवार, दि.०३ जुलै २०२५ | ६

# मुलींनो निडर व्हा –सपोनि ढाकणे

## मुलींच्या सुरक्षेबाबत दिंद्रुड पोलिसांचे विद्यार्थिनींना धडे

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील इंदिरा गांधी कन्या शाळेतील विद्यार्थिनींना निडर होत चुकीच्या गोष्टींना बळी पडू नका, आपल्या बाबत काही चुकीच्या घटना घडत असतील तर प्रकाशात आणा, आपल्या सुरक्षेसाठी पोलीस सदैव सतर्क असल्याबाबत दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनि महादेव ढाकणे यांनी बुधवारी मार्गदर्शन केले. समिधा संस्थेच्या वतीने पुस्तक भेटीच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

बीड जिल्ह्यातील बीड येथील कोचिंग क्लासेस मध्ये विद्यार्थिनींवर झालेल्या अघटीत घटनेने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न



निर्माण झाला आहे. यासाठी दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या वतीने दामिनी पथक, पोलीस काका व पोलीस दिदी यांची कामे त्याचप्रमाणे मुलींच्या सुरक्षेविषयी विशेष धडे सपोनी महादेव ढाकणे यांनी विद्यार्थिनींना दिले. मुलींच्या बाबत काही अघटित घटना घडत असतील तर शंका मनात न ठेवता थेट पालक, आपल्या शाळेतील वर्ग शिक्षक, शिक्षिका व पोलिसांना याबाबत कळवत काही अघटीत होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत ढाकणे यांनी मुलींना मार्गदर्शन केले. मोबाईलच्या आहारी न

**किशोरवयीन मुलींमध्ये गुड टच व बॅड टच बाबत जागरूकता असणे आवश्यक आहे. सतर्क राहिल्यास तसेच मुलींनी योग्य वेळी लहान सहान अडचणी आपल्या पालकांना सांगितल्यास मुलींच्या बाबतीत अघटीत घटना घडणार नाहीत. चुकीच्या बाबी निदर्शनास आल्यास त्यांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा आम्ही तत्परतेने दखल घेऊन पुढील कारवाई करू. –सपोनि महादेव ढाकणे**

जाता पुस्तक वाचनावर भर द्यावा, आपल्या आई–वडिलांची मान शरमेने खाली जाणार नाही यासाठी काळजी घ्यावी याबाबत ढाकणे यांनी उपदेश दिला. बुधवारी समिधा फाउंडेशन व सरहद फाउंडेशन च्या वतीने शेकडो पुस्तकांचे वाटप इंदिरा गांधी कन्या शाळेत संस्थेचे समन्वयक देवराज युवराज ठोंबरे यांच्या वतीने करण्यात आले. याप्रसंगी सपोनी महादेव ढाकणे, पोलीस शिपाई अंजना मेंडके, ज्ञानेश्वर म्हेत्रे माजी उपसरपंच युवराज ठोंबरे, बळीराम डापकर, नारायण चांदबोधले, ग्रां.पं. सदस्य महेश ठोंबरे, पत्रकार संतोष स्वामी, गणेश काटकर, मुख्याध्यापक अशोक बोचरे, रामराव लांडगे, ग्रंथालय विभाग प्रमुख डाके यांची उपस्थिती होती.

# रोटरी क्लबच्या रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान




माजलगाव । प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने रोटरी नववर्ष दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे मंगळवार रोजी आयोजन करण्यात आले होते.यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रो डॉ.राधाकिसन डाके यांच्या माऊली हार्ट केअर हॉस्पिटल मध्ये आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.क्लब चे नवनिर्वाचित अध्यक्ष रो. विनोदकुमार बजाज, नवनिर्वाचित सचिव रो.दिगंबर महाजन यांनी या कामी पुढाकार घेतला.रो. सुरेश भानप,रो. अशोक बजाज,रो. स्मिता लिंबगावकर,रो. शशिकिरण गडम, रो.अर्चना पवार,रो. स्वानंद कुलकर्णी, रो.लता जोशी,रो. शंकर

◀◀ पान ३ वर

# स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या मार्फत राधे राधे जिनिंगच्या प्रॉपर्टीचा लिलाव ४ जुलैला होणार

**कोर्टाने मनाई आदेश केला रद्द**

माजलगाव । प्रतिनिधी

शहा मसीन व इतर यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा माजलगाव यांच्या विरुद्ध दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर माजलगाव येथील दिवाणी न्यायाधीश गणेश एस.खूपसे यांच्या न्यायालयात निरंतर मनाई हुकूम मिळणे बाबत नियमित दिवाणी दावा क्रमांक २५१/२०२५ दिला व बँकेने दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी होऊ घातलेली राधे राधे जिनिंगचे प्रोप्रायटर राधेश्याम दायमा यांच्या धनगरवाडी पातळवाडी येथील गट नंबर ६१ मधील जमिनीच्या लिलावास स्थगितीचा आदेश घेतला.त्यानंतर सदर प्रकरणात स्टेट बँक ऑफ इंडिया माजलगाव यांच्यातर्फे त्यांचे वकील एडवोकेट संजय म पोत्रेकर व लिमगावकर हे हजर झाले.बँकेतर्फे एडवोकेट संजय पोत्रेकर यांनी वादी बँकेची दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी होत असलेली राधेश्याम दायमा यांच्या प्रॉपर्टीचे लिलावास कोर्टाने प्रॉपर्टीचा लिलाव न करणे बाबत मनाई हुकूम दिला होता तो रद्द करणे बाबत अर्ज दिला. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३० जुन २०२५ रोजी प्रकरणात प्रतिवादी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने एडवोकेट संजय पोत्रेकर यांनी युक्तिवाद केला व वादी करिता एडवोकेट कदम यांनी युक्तिवाद केला. बँकेतर्फे युक्तिवाद करत असताना एडवोकेट संजय पोत्रेकर यांनी युक्तिवाद केला की सरफेसी कायद्याचे कलम ३४ अन्वये या कोर्टात सदर दावा चालवण्याचा अधिकार नाही तसेच कोर्टाला सदर प्रकरणात मनाई हुकूम देता येणार नाही तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता च्या आदेश ०७ नियम ११ प्रमाणे वादीला सदरचा दावा या कोर्टात दाखल करण्यास बाधा

◀◀ पान ३ वर

# आजाद समाज पार्टी माजलगाव विधानसभेची कार्यकारणी जाहिर

## गोरख टाकणखार यांची विधानसभा अध्यक्षपदी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

आजाद समाज पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार भाई चंद्रशेखर आजाद यांच्या नेतृत्वाखाली समग्र एस.सी.एस.टी., ओ.बी.सी.आणि धार्मीक अल्पसंख्यांक समाज एकत्र येत आहे.भाई चंद्रशेखर आजाद देशातील सामान्य माणसांचे प्रश्न संसदेत मांडून त्यांना न्याय देण्याचे मुलभूत काम करत आहेत याच गोष्टींचा परिणाम तरूण पिढीवर होत आहे. त्यामुळे हजारों तरूण आजाद समाज पार्टीमध्ये प्रवेश करत आहेत, यामुळे बहुजन समाजात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्रामध्ये पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत.बीड जिल्ह्यामध्ये विधानसभा निहाय पक्ष संघटन बांधणीच्या कामाने वेग धरला आहे.

दि २६ जुन २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता शासकीय विश्रामगृह, माजलगाव येथे आजाद समाज पार्टीची विधानसभा कार्यकारणी गठित करण्याकरीता बैठकीचे आयोजन करण्यात आले. आजाद समाज पार्टीचे प्रदेश प्रभारी रुपेश बागेश्वर व प्रदेश अध्यक्ष मनिष साठे यांच्या आदेशान्वये तसेच प्रदेश सचिव तथा बीड जिल्हा प्रभारी डॉ.सिध्दार्थ

◀◀ पान ३ वर



# मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत पिंपळवंडी–अंमळनेर परिसरातील बळीराजाचे डोळे चातकाप्रमाणे आभाळाकडे

**पावसाअभावी कोवळी पिके कोमजू लागली**

पिंपळवंडी । प्रतिनिधी

भर उन्हाळ्यात यावर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे बळीराजाच्या आशा पल्लवीत होऊन यावर्षी वरुणराजा धोका देणार नाही अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती.परंतु,सध्या पिकांना पाण्याची गरज असताना पावसाळा सुरू होऊनही पावसाने डोळे वटारल्याने पावसाअभावी खरीप हंगाम धोक्यात येऊन शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेचे ढग दिसत आहेत.या वर्षी पाटोदा तालुक्यात अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या त्यानंतर मृग नक्षत्रात सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाला.त्यामुळे कित्येक ठिकाणी बळीराजाने खरिपाच्या पेरण्या केल्या. काही ठिकाणी अति पावसाने जमिनी कडक तर अनेक जमिनीला पाणी लागल्याने पेरण्यास विलंब झाला. पावसाळ्यातील जून महिना अत्यंत महत्त्वाचा पण या महिन्यात म्हणावा तसा पाऊस पडलेला नाही.अवकाळी व मृग नक्षत्रात झालेल्या पावसाच्या मुहूर्तावर पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी, अंमळनेर,कोतन तसेच खोपटी, भडकेल, पांगरी परिसरातील शेतकऱ्यांनी महागा–मोलाचे संकरित बियाणे,खते खरेदी करून सोयाबीन, कापूस, उडीद, तूर,मूग,बाजरी व इतर खरीप पिके पेरून काळ्या आईची ओटी भरली.सध्या कोवळी कोवळी पिके पावसाअभावी सुकू लागली आहेत.सध्या पिकांना पावसाची खूपच गरज आहे.कोवळी पिके खुरपून पावसाने हुलकावणी दिल्याने शेतकरी चातकाप्रमाणे आभाळाकडे डोळे लावून वाट पहात आहे.मागील काही दिवसापासून सकाळी ढगाळ वातावरण होऊन आता मुसळधार पाऊस पडतो की काय असे काळे कुट्ट भयानक ढग जमा होतात पण दुपारनंतर जोराचे वारे वाहू लागतात व त्या वाऱ्यांनी ढग गायब होऊन पाऊस काही येतच नाही.पावसाच्या लहरीपणामुळे काही ठिकाणी शेतात बियाणे उगवले नाही.त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंडाची झळ पोहचली. सोयाबीन, कापूस, मूग,उडीद नगदी पिकांवर शेतकऱ्यांचे वार्षिक नियोजन ठरले जाते.हिच पिके उत्पन्न देणारी शेतकऱ्यांची जमेची बाजू आहे.येत्या चार–आठ दिवसात वरुणराजाची कृपा झाली तरच खरिपाची पिके हाती येतील अन्यथा शेतकऱ्यांपुढे आर्थिक संकट उभे राहून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागणार आहे. वाढत्या महागाईमुळे शेतकऱ्यांना खरिपाच्या पेरणीसाठी मोठी उलाढाल करून खते–बियाणे नगदी,उधारीवर इकडून–तिकडे

◀◀ पान ३ वर

# बीडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

## डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून अ.भा.म. नाट्य परिषद, के.एस.के.महाविद्यालयाचा उपक्रम



बीड । प्रतिनिधी

ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंदाची रंगत निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची बीड शाखा व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालयातील नाट्यशास्त्र व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी बीडमध्ये येत्या दि.१७ जुलै रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रमाचे दरवर्षी आयोजन केले जाते. यामध्ये गीत गायन, नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टँडअप कॉमेडी आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, तसेच तरुण वयात जोपासता न आलेले छंद साकार करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी आपली नावे नोंदवावीत, त्यासाठी डॉ.दुष्यंत रामटेके ९७६७३५५२९४, डॉ.संजय पाटील देवळाणकर ९४२२२९५३१४, डॉ.राहुल सोनवणे ९८२२५७७६७१, डॉ.दीपक जमधाडे ८८८८८५०३५८, डॉ.अनिता शिंदे ७२७८३०५०५०, प्रा.विजय राख ९८३३३४५८०९, सुरेश थोरात ९४२२९११०९० यांच्याशी संपर्क करावा, असे संयोजकांनी म्हटले आहे.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त माजलगाव येथे कृषी दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि पंचायत समिती माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने दि १ जुलै हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून पंचायती समिती सभागृह माजलगाव येथे साजरा करण्यात आली

या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती ज्योत्सना मुळीक प्रशासक तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांच्या हस्ते




संपन्न झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना एस.एस.भोकरे कृषी अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांनी स्व.वसंतराव नाईक यांचे जीवन चरित्र व कार्य याविषयी उपस्थितना माहिती दिली प्रमुख मार्गदर्शक अतिश चाटे मंडळ कृषी अधिकारी केसापुरी यांनी सध्याच्या परिस्थितीमध्ये पिकाचे संरक्षण करण्याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रमुख गणेश बादाडे तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी स्व.वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्य व अमुलाग्र बदल तसेच शेतकऱ्यांना सध्याच्या परिस्थितीमध्ये शेतीमध्ये असणाऱ्या अडचणीवर मात करून नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीमधील उत्पादन वाढवण्या

◀◀ पान ३ वर

# सौ. के.एस.के. (काकू) कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांकडून खापरपांगरीत कृषी दिन साजरा

### वृक्षारोपणाने दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

खापरपांगरी (ता. बीड) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) कृषी महाविद्यालय, म्हसोबा फाटा, बीड येथील कृषीदूतांनी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त गावात कृषी दिन साजरा करत एक आगळावेगळा उपक्रम राबवला.



या दिनाचे औचित्य साधून खापरपांगरी गावात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ''एक मूल, एक झाड'' ही संकल्पना घेऊन कार्यक्रम पार पडला. लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालय खापरपांगरी येथील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला, तर गावातील शेतकरी बांधवांनी देखील या उपक्रमाचे स्वागत केले.

कार्यक्रमात ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणाचे कार्य गावातील मान्यवरांच्या हस्ते विविध ठिकाणी पार पडले. या कार्यक्रमासाठी सौ. मीरा बोत्रे (कृषी सहायक), सौ. वर्षा जोगदंड (ग्रामसेवक), सौ. अंजना राम माने (सरपंच) तसेच श्री. विक्रम अण्णा शेंडगे, मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय घोडके, व लोकमान्य टिळक विद्यालयातील

◀◀ पान ३ वर

# एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पूर्वीच्याच ठिकाणी थांबा द्या

## पोस्ट ऑफिसमध्ये कर्मचारी व काऊंटर वाढवा, समाजवादी पार्टीचे पोलिस निरीक्षक व पोस्ट मास्टर यांना निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्या, तसेच पोस्ट ऑफिस मध्ये नागरिकांची वाढती गर्दी पहाता कर्मचारी व काऊंटर यांची संख्या वाढवावी अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ऍड.शिवाजी कांबळे, शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी अंबाजोगाई शहर ठाण्याचे पोलिस निरीक्षक व पोस्ट मास्टर यांना मंगळवार, दिनांक १ जुलै रोजी दिलेल्या दोन स्वतंत्र निवेदनातून केली आहे.

याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले की, पोलिस निरीक्षक यांना दिलेल्या पहिल्या निवेदनात नमूद केले आहे की, समाजवादी पार्टी, अंबाजोगाई (जि.बीड) यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी तसेच एस.टी.आगारप्रमुख यांना यापूर्वी दि.३० एप्रिल २०२५ रोजी निवेदन देण्यात आलेले आहे. तरी एस.टी डेपो मॅनेजरने सांगितले की, पोलीस स्टेशनला कळवा. म्हणून आज रोजी आम्ही आपणांस निवेदन देत आहोत. विषय असा की, पोलिस प्रशासनाने अंबाजोगाई शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोर जागा उपलब्ध करून दिल्यास आम्ही एस.टी तिथे थांबवू, पुर्वी एस.टी बसेस या छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील जिल्हा परिषद शाळेसमोर थांबत होत्या. तेथे प्रवासी बसेस मधून उतरत असत. सध्याच्या थांबामुळे रहदारी व वाहतूकीस मोठा अडथळा निर्माण होतो आहे. कारण, मोंढा रोडपासून ट्राफिक जाम होतो. मोंढा येथे दर मंगळवारी बाजार भरतो. तसेच या परिसरातच न्यायालयाकडे, स्वाराती रूग्णालयाकडे जाणारा रस्ता आहे. आणि आद्यकवी मुकुंदराज समाधी परिसराकडे जाणारा रस्ता व श्री योगेश्वरी देवी मंदीराला जाणारा रस्ता ही आहे. मोंढ्याकडून आणि स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाकडून दोन्ही साईडची ट्राफीक छत्रपती शिवाजी महाराज चौक नजीक मध्यभागी एसटी बसेस थांबत असल्यामुळे ट्राफीक जाम होते. त्यामुळे एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्यावा तसेच अंबाजोगाई येथील पोस्ट कार्यालयात फार पुर्वीपासून जेवढे कांऊटर आहेत. आज सुध्दा तेवढेच कांऊटर व कर्मचारी आहेत. दिवसेंदिवस पोस्टाच्या विविध सुविधांचा लाभ घेणाऱ्या नागरिकांची गर्दी वाढत आहे. मुलभूत सुविधा तात्काळ मिळत नाहीत. यासाठी ग्राहक तसेच जेष्ठ नागरिक यांना पोस्ट ऑफिस मध्ये ताटकळत थांबावे लागते. बँक व्यवहारासाठी तसेच रजिस्टर पोस्ट आणि विविध कामांसाठी कांऊटर कमी असल्यामुळे


◀◀ पान ३ वर

# ज्येष्ठानी प्रतीवर्षी प्रकृती तपासणी करून घेणे आवश्यक –डॉ.अरुणराव डावळे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**ज्येष्ठांच्या वयाप्रमाणे त्यांच्या प्रकृती मध्ये अनेक बदल घडून येतात. म्हणून ज्येष्ठांनी आपली तपासणी दरवर्षी करून घेणे आवश्यक आहे. असे उद्गार ज्येष्ठ शैल्य चिकित्सक डॉक्टर डावळे यांनी जेष्ठ नागरिक संघ अंबाजोगाई चांनी आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमात व्यक्त केले.**

वयाच्या साठी नंतर शरीरातील रक्तदाब, मधुमेह, दंत, नेत्र,कांन,हाडे, हृदय, स्नायू व त्वचा वर परिणाम होत असतो म्हणून तज्ञा कडून तपासणी



करून व वेळीच विलाज करणे आवश्यक आहे. असे मार्गदर्शन व्यंकरराव डावळे प्रतिष्ठान चे संचालक जेष्ठ शल्य चिकित्सक डॉ. अरुणराव डावळे चांनी जेष्ठ नागरिक संघ अंबाजोगाई च्या मासिक सभेत केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ नागरिक संघांचे अध्यक्ष अनंतराव जगतकर होते तर या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून जेष्ठ नागरिक संघ केजचे सचिव गदळे सर व कोषध्यक्ष रामेश्वर जाजू होते तर व्यासपीठावर थोरात सर, पुंडलिक पवार शिवाजी शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात प्रार्थनेने तर शेवट राष्ट्रगानाने झाला, संचालन पुष्पा बागडे चांनी प्रस्तावना अनंतराव जगतकर चांनी तर आभार ज्ञानोबा कुकडे चांनी मानले. बैठकीत जून महिन्यात वाढदिवस असणाऱ्या सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमात जेष्ठ संघातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# पुण्याचा भोंदूबाबा गुंगीचे औषध देऊन भक्तांसोबत करायचा अश्लील चाळे

## उपायाला विरोध केल्यास चिठ्ठीवर तारीख लिहायचा; 'या दिवशी तुझा मृत्यू होणार!'

**पुणे । प्रतिनिधी**

अंधश्रद्धेचा फायदा घेत भक्तांची फसवणूक करणाऱ्या एका भोंदूबाबाची हायटेक विकृती समोर आली आहे. प्रसाद दादा ऊर्फ बाबा ऊर्फ प्रसाद तामदार (वय २९, रा. सूस गाव, मुळशी) या तथाकथित बाबावर बावधन पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून, त्याच्या विरोधात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तपासादरम्यान पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली आहे. आरोपी भोंदूबाबा भक्तांच्या मोबाइलमध्ये 'हिडन प' डाऊनलोड करून त्यांच्या खासगी क्षणांवर नजर ठेवत असे. याशिवाय, तो भक्तांना गुंगीचे औषध देऊन अश्लील चाळे करत होता. या कृत्याची झलक तपासात पाच वेगवेगळ्या भक्तांच्या चौकशीतून समोर आली आहे. बाबा स्वतःला भक्तांचे दोष स्वतःवर घेतो, त्यांच्यावर संकट आहे, आणि त्यासाठी विशिष्ट उपाय करतो, अशी बतावणी करत असे. एखादा भक्त त्याच्या या नीच कृतीला विरोध करत





असे, तर तो एका कागदावर मृत्यूची तारीख लिहून भीती दाखवत असे, की त्या दिवशी तू मरशील! त्यामुळे अनेक भक्त मानसिक दबावाखाली त्याच्या सांगण्यानुसार वागत होते.

या प्रकरणातील आरोपी भोंदूबाबाच्या पोलिस कोठडीची मुदत संपल्याने त्याला काल (मंगळवारी) न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. आरोपीकडून तीन मोबाइल, एक डिजिटल पॅड, सहा पेनड्राइव्ह, चार मेमरी कार्डसह अस्वस्थता आणि निद्रानाशावरील गोळ्यांचे पाकीट देखील जप्त करण्यात आली आहेत. 'आरोपीने भक्तांचे खासगी क्षण 'हिडन प'द्वारे रेकॉर्ड करून लॅपटॉपमध्ये सेव्ह केल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीने पुरुषांप्रमाणेच महिला व लहान मुलांचीही फसवणूक केली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे, त्याने स्थापन केलेली संस्था कायदेशीर आहे का, यासह विविध मुद्द्यांवर तपास करण्यासाठी आरोपीच्या पोलिस कोठडीत वाढ करावी,' अशी मागणी तपास अधिकारी उपनिरीक्षक सारंग ठाकरे आणि सरकारी वकील विजयसिंह जाधव यांनी केली. ती मान्य करून न्यायालयाने आरोपीच्या पोलिस कोठडीत चार दिवसांची वाढ करण्यात आली आहे.


आरोपी बाबाने भक्ताला नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये मोठं संकट येणार असल्याची भीती दाखवून त्याच्या मोबाइलमध्ये 'हिडन प' डाउनलोड करायला सांगितलं. त्यानंतर त्याला पाण्यातून गुंगीची गोळी देऊन अनैसर्गिक अत्याचार केले. दुसऱ्या भक्ताला गुंगीचे औषध देऊन अश्लील चाळे करताना दोष स्वत:वर घेत असल्याची बतावणी देखील केली. आणखी एकाला त्याचे दोष दूर करण्यासाठी 'हिडन प' सुरू ठेवून मैत्रिणीशी संबंध प्रस्थापित करण्यास सांगितले. आरोपीच्या चाळ्यांना एका भक्ताने विरोध केला असता, 'तू उपाय अर्धवट सोडून चालला आहे,' असे सांगून एका कागदावर तारीख लिहून त्या तारखेला मृत्यू होईल, अशी भीती घातल्याचे भक्तांनी सांगितले.

# शिकारीसाठी बिबट्या दारात; ज्येष्ठ दाम्पत्य थोडक्यात बचावले

**मंचर । प्रतिनिधी**

**निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील दांगटवस्ती येथे शिकारीच्या शोधात मांजराचा पाठलाग करताना बिबट्या घराच्या दारात आला. ही घटना सोमवारी (दि. ३० जून) रात्री ८ वाजता घडली. घरात असलेले ज्येष्ठ दाम्पत्य यांनी जोरजोरात आरडाओरडा केल्याने बिबट्या दरवाजातूनच माघारी फिरल्याने हे दाम्पत्य थोडक्यात बचावले.**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, निरगुडसर दांगटवस्ती येथे सुरेश श्रीपती दांगट (वय ६५) व त्यांची पत्नी ताराबाई (वय ६०) हे राहतात. त्यांची मुले कामानिमित्त मुंबई या ठिकाणी असतात. सोमवारी रात्री ८ वाजेच्या दरम्यान दांगट दाम्पत्य घरात बसलेले असताना त्यांची पाळलेली दोन मांजरे घराबाहेर खेळत होती. घराशेजारी असलेल्या उसाच्या शेतातून शिकारीच्या शोधात आलेल्या बिबट्याने त्यांच्या मांजरांचा पाठलाग केला. त्यामुळे मांजरे घरात पळाली. त्याबरोबर बिबट्यादेखील मांजरांच्या मागे घराच्या दारापर्यंत आला.



सुरेश दांगट घरातून उठून बाहेर जाण्यासाठी निघाले असता ताराबाई यांनी त्यांना दरवाजात बिबट्या आहे, बाहेर जाऊ नका असे सांगत जोरजोरात आरडाओरडा केला, तसेच घरातील काठीने दरवाजावर जोरजोरात मारत मोठा आवाज केल्याने बिबट्या निघून गेला; मात्र घडलेल्या प्रकाराने दांगट दाम्पत्य खूप घाबरले होते. देवाची कृपा म्हणून आम्ही वाचलो असे ताराबाई दांगट यांनी सांगितले. याबाबत माजी उपसरपंच आनंदराव वळसे पाटील यांनी वन विभागाच्या अधिकार्यांना माहिती दिली.वनरक्षक अश्विनी डफळ, वन कर्मचारी दशरथ मेंगडे यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली आहे. या ठिकाणी पिंजरा लावावा, अशी मागणी येथील प्रगतीशील शेतकरी शिवाजी दांगट, कारभारी दांगट, बाळासाहेब दांगट आणि विशाल दांगट यांनी केली आहे.

यापूर्वी अनेकदा बिबट्याचे हल्ले

दांगटवस्ती या परिसरात बिबट्याचे वास्तव्य असून दोन दिवसापूर्वी सुरेश दांगट यांच्या घराच्या पाठीमागे असलेल्या शेतातून पहाटे सहा वाजता बिबट्या जाताना ताराबाई दांगट यांनी पाहिला होता. या अगोदरही सुरेश दांगट यांची दोन पाळीव कुत्री, एक कालवड बिबट्याने फस्त केली असून शेजारी राहणारे शिवाजी दांगट यांचे तीन पाळीव कुत्री तर पुष्पाबाई दांगट यांचा एक पाळीव कुत्रा बिबट्याने आतापर्यंत ठार केला आहे.

# भोर तालुक्यातील सरपंच पदासाठी आरक्षण सोडत ७ जुलै रोजी

**भोर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांसाठी २०२५ ते २०३० या कालावधीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याची सोडत ७ जुलै २०२५ रोजी दुपारी १२ वाजता भोर येथील अभिजीत मंगल कार्यालय, महाड रोड येथे होणार आहे.

तहसिलदार कार्यालय, भोर यांनी जिल्हाधिकारी (ग्रामपंचायत शाखा), पुणे यांच्या २५ जून २०२५ रोजीच्या पत्र क्रमांक पसप-३/कावि/७१८/२०२५ नुसार ही कार्यवाही हाती घेतली आहे. तहसिलदार राजेंद्र नजन यांनी सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामसेवकांना सूचना दिल्या असून, या सोडतीची नोटीस ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर आणि चावडीवर लावण्याचे तसेच दवंडी देऊन प्रसार करण्याचे निर्देश दिले आहेत.

यासंदर्भातील प्रसिद्धी अहवाल ३ जुलै २०२५ पर्यंत तहसिल कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. ही प्रक्रिया ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सामाजिक न्याय आणि समता सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाची आहे.

# मुख्याध्यापकांच्या सेवानिवृत्तीनिमीत्त गावकऱ्यांनी काढली घोड्यावरून मिरवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

कुरकुंभ (ता. दौंड) येथील उत्कर्ष शिक्षण संस्थेच्या फिरंगाईदेवी विद्यालयात सलग ३५ वर्षे मुख्याध्यापक असणारे नानासाहेब भापकर हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तीनिमित्त आपापसातील मतभेद विसरून सारे गाव कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले.

ग्रामस्थांनी उत्तरदायित्व म्हणून निवृत्तीनिमित्त त्यांची घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली. डीजेचा निनाद, फटाक्यांची आतषबाजी, रांगोळीच्या पायघड्या व महिलांच्या औक्षणाने त्यांचे स्वागत करण्यात आले. सेवानिवृत्तीच्या भाषणामध्ये अनेक मान्यवरांना व विद्यार्थ्यांना भापकर यांच्या कार्याचा आढावा घेताना



भावना अनावर झाल्या.

कुरकुंभ येथील मुख्य चौक-फिरंगाई मंदिर-फिरंगाई देवी विद्यालय या परिसरात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी माजी शिक्षणाधिकारी अनिल गुंजाळ म्हणाले की, भापकर यांच्या काळामध्ये शाळेचा खऱ्या अर्थाने विकास झाला. त्यांनी अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी दत्तक घेतले. विशेष म्हणजे दुष्काळी भागातील मुलींचे शिक्षण अर्धवट राहू नये म्हणून शाळेसाठी कायमस्वरूपी दोन एसटी बस चालू केल्या. एखाद्या व्यक्तीच्या निवृत्तीच्या प्रसंगी संपूर्ण गाव उपस्थित असल्याचा हा माझ्या अनुभवातील पहिलाच प्रसंग आहे.

यावेळी राष्ट्रवादी श. प. तालुका अध्यक्ष आप्पासाहेब पवार, अंकुश शिंदे, दत्तात्रेय ढोले, उत्कर्ष शिक्षण संस्थेचे अध्यक्ष केशव शितोळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला सरपंच सुनील खंडाळे, उपसरपंच संजय शितोळे, पोलीस पाटील रेश्मा शितोळे, शिवाजी भागवत, सुनिता भापकर आदी मान्यवर उपस्थित होते. माजी विद्यार्थी राहुल शितोळे, विनोद शितोळे, संदीप भागवत, जयश्री भागवत, नवनाथ गायकवाड, अल्लादिन शेख यांनी संयोजन केले. शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम पथक व आर एस पी पथकातुन भापकर यांना मानवंदना दिली.

# गुंजवणी धरण ६३ टक्के भरले; तोरणा, राजगडमध्ये पावसाची संततधार



**वेल्हे । प्रतिनिधी**

तोरणा, राजगड व रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील घाटमाथ्यांवर संततधार सुरू असून, त्याचा सकारात्मक परिणाम गुंजवणी धरण पाणलोटक्षेत्रावर दिसून येतो आहे. मंगळवारी (दि. १) सकाळी धरणाचा पाणीसाठा २.३४ टीएमसी म्हणजेच ६३.३१ टक्क्यांवर पोहोचला.

गुंजवणी धरणावर सोमवार (दि. २०) पासून मंगळवारी सकाळपर्यंत ३४ मि.मी पावसाची नोंद झाली. तर १ जूनपासून आतापर्यंत ९२४ मि.मी इतका पाऊस झाला आहे. धरणाचे उपअभियंता नयन गिरमे यांनी ही माहिती दिली.

कोदापूर, अंत्रोली, निवी, कानंद, घेंवडे भट्टी, घिसर-रायदांडवाडी घाटमाथ्यावर दि. १५ मेपासून पावसाची नियमित नोंद होत आहे. सततच्या पावसामुळे ओढे-नाले दुथडी भरून वाहत आहेत. या पावसामुळे गुंजवणी धरण जुलैच्या पहिल्या किंवा दुसर्या आठवड्यात पूर्णक्षमतेने भरण्याची शक्यता आहे.

# पीएमआरडीएमधील अधिकार्यांच्या बदल्या; अतिक्रमण व अभियांत्रिकी विभागात मोठे बदल

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात (पीएमआरडीए) राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकार्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अतिक्रमण निर्मूलन विभागातील तीन अधिकारी, अभियांत्रिकी विभागातील एका महिला अधिकाऱ्याची बदली तर दोन अधिकाऱ्यांची सेवानिवृत्ती झाली आहे. पीएमआरडीएत महसूल विभागासह शासनाच्या विविध विभागांतून अधिकारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. या अधिकार्यांची नियुक्ती जमीन व मालमत्ता, अतिक्रमण निर्मूलन, विकास व परवानगी विभागांमध्ये करण्यात आलेली असते. या यंत्रणेत उपजिल्हाधिकारी, तहसीलदार आणि वरिष्ठ अभियांत्रिकी अधिकारी यांचा समावेश असतो. अतिक्रमण




निर्मूलन विभागातील उपायुक्त (उपजिल्हाधिकारी) प्रमोद कुदळे यांची बदली कोरेगाव, सातारा येथे उपविभागीय अधिकारी म्हणून झाली आहे. तसेच, या विभागातील तहसीलदार सचिन म्हस्के यांची प्रतिनियुक्ती समाप्त करून त्यांची महाबळेश्वर, सातारा येथे नेमणूक करण्यात आली आहे.

अभियांत्रिकी विभागातील उपअभियंता शीतल देशपांडे यांची बदली ग्रामविकास विभाग, पुणे येथे करण्यात आली असून त्यांच्या जागी स्नेहल अंबू यांनी पदभार स्वीकारला आहे. पीएमआरडीएमध्ये नुकतीच सेवानिवृत्ती पत्करलेले अधिकारी म्हणजे काही महिन्यांपूर्वी जिल्हा पुरवठा अधिकारी पदावरून सहआयुक्तपदी रुजू झालेले संजय गायकवाड तसेच अभियांत्रिकी विभागातील एक वरिष्ठ अभियंता यांचा समावेश आहे.

# ट्रक-दुचाकीच्या धडकेत एक ठार, दोघे जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून, अन्य दोघेजण जखमी झाले आहेत. ही घटना पुणे-सोलापूर रस्त्यावरील वानवडी परिसरात घडली. या अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला आहे.

रितेशकुमार महिंदरसिंग (वय २७, रा. वानवडी, मूळ रा. लोहदरदुर्ग, झारखंड) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. दुचाकीस्वार शुभम ज्ञानेश्वर इंगळे (वय २७, रा. थिटे वस्ती, खराडी) आणि रवी चौरासिया हे जखमी झाले आहेत. याबाबत पोलिस हवालदार सचिन घोडके यांनी वानवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. धोकादायक पद्धतीने वाहन चालविल्याप्रकरणी ट्रकचालक आणि दुचाकीस्वार या दोघांविरुद्ध मंगळवारी (ता. १) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार शुभम




इंगळे, रितेशकुमार आणि रवी चौरासिया हे दुचाकीवरून ट्रिपल सीट निघाले होते. वानवडीतील क्रोम शोरूम चौकात भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिली. या अपघातात रितेशकुमार आणि चौरासिया गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान रितेशकुमार याचा मृत्यू झाला.

# स्लॅबचा सज्जा कोसळला; मजुराचा जागीच मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

लष्कर भागातील एका नियोजित इमारतीच्या स्लॅबचा सज्जा कोसळून एका बांधकाम मजुराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी घडली. तर या दुर्घटनेत तीन मजूर गंभीर जखमी झाले असून, एकाची प्रकृती चिंताजनक आहे.



शुभंकर जधबा मंडल (वय २१, रा. पश्चिम बंगाल) असे मृत्युमुखी पडलेल्या बांधकाम मजुराचे नाव आहे. चेंन्नी मंगल मुखर्जी (वय २१, रा. कोलकात्ता), वरूण (वय ३५), संन्याशी बकदी (वय २९) अशी गंभीर जखमी झालेल्यांची नावे आहेत. (ड्रींशींी झींपश छशुी) याप्रकरणी लष्कर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लष्कर भागातील साचापीर स्ट्रीट परिसरातील मेहेर अपार्टमेंटच्या समोरच एका इमारतीचे बांधकाम सुरू आहे. इमारतीच्या चौथ्या मजल्याचा स्लॅब टाकण्यात आला आहे. स्लॅबला लाकडी फळी, सळई लावण्यात आली आहे. मंगळवारी (दि.१) दुपारी दोन वाजताच्या सुमारास मंडल, मुखर्जी, वरुण, बकदी हे चौथ्या मजल्यावर काम करत होते.

स्लॅबचा सज्जाजवळ असलेल्या सळई, तसेच फळ्यांची पाहणी करत असताना अचानक सज्जा कोसळला. चौघेजण तिसर्या मजल्यावर कोसळले. या चौघांना तातडीने ससून रुग्णालयात नेण्यात आले. उपचारांपूर्वीच शुभंकर याचा मृत्यू झाला होता, अशी माहिती लष्कर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांनी दिली. दुर्घटना घडल्यानंतर पोलिस तीन तास उशिरा पोहोचल्याचा आरोप या भागातील रहिवाशांना केला. महावीर इन्व्हेस्टर्सचे सुनील रांका यांच्याकडून या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. युवराज राऊत नावाची व्यक्ती ठेकेदार असल्याचे समजले आहे. ही घटना पोलिसांना लगेच का कळविली नाही, याची चौकशी केली जाणार आहे.

# मोक्का गुन्ह्यातील दोन वर्षांपासून फरार आरोपी जेरबंद; आंबेगाव पोलीसांची कौशल्यपूर्ण कामगिरी

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यात तब्बल दोन वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अखेर आंबेगाव पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई १ जुलै २०२५ रोजी दुपारी करण्यात आली. आरोपी सुनिल संजय गायकवाड ( २०, रा. सच्चाईमाता नगर, दुगड शाळेजवळ, आंबेगाव खुर्द, पुणे) हा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गु.र.नं. ७९८/२०२३ अंतर्गत गुन्ह्यात पाहिजे होता.

त्याच्यावर भादंवि कलम ३१५, ३२६, १४३, १४७, १४९, ५०४, ५०६(२) तसेच क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कायदा




कलम ७ व मोक्का कायदा कलम ३(१)(११), ३(२), ३(४) अंतर्गत गंभीर आरोप होते. पोलिस अंमलदार पेट्रोलिंग दरम्यान हद्दीत गस्त घालत असताना, पो.अं. चेतन गोरे यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे आरोपी हा आपल्या मित्राला भेटण्यासाठी राहत्या घराजवळ आल्याचे समजले.

तत्काळ कारवाई करत तपास पथकाने त्या ठिकाणी धाव घेऊन आरोपीला अटक केली. त्यानंतर पोलिस ठाण्यात आणून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग यांच्याकडे सुरू आहे. कारवाईत आंबेगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गजानन चोरमले, पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर यांच्यासह पोलीस कर्मचारी शैलेंद्र साठे, चेतन गोरे, हणमंत मासाळ, निलेश जमदाडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, प्रमोद भोसले, नितीन कातुर्डे, योगेश जगदाळे, सुभाष मोरे, हरिश गायकवाड, अजय कामठे, ज्ञानेश्वर चित्ते यांच्या पथकाने सहभाग घेतला. आरोपीच्या अटकेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास वाढला असून, आंबेगाव पोलीस स्टेशनच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सरदवाडी येथे शिवपानंद रस्त्यासंदर्भात बैठक संपन्न

**शिरूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र कृषी दिनाचे औचित साधून सरदवाडी येथे शिवपानंद पूर्वापार शेतवहिवाटीचा रस्त्या संदर्भात सरदवाडी गावच्या प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच लक्ष्मी बाळासाहेब जाधव यांनी बैठक आयोजित केली होती.

या बैठकीत महाराष्ट्र राज्य शेत पानंद रस्ते चळवळीचे प्रणेते शरद भाऊ पवळे यांनी मार्गदर्शन केले. शिवपानंद रस्ते ही चळवळ संपूर्ण महाराष्ट्रभर चालू असून शेवटच्या बांधापर्यंत जोपर्यंत शेतकऱ्यांना रस्ता मिळत नाही तोपर्यंत चळवळ शांत बसणार नाही असे पवळे यांनी सांगितले. तसेच ॲड. सुप्रिया साकोरे यांनी कायदेशीर मार्गदर्शन केले. विजय शेलार यांनी शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व रस्त्याचे महत्त्व पटवून दिले. सरदवाडी हे गाव



रोड मॉडेल व्हिलेज म्हणून घोषित करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सरपंच लक्ष्मी जाधव यांनी सांगितले. तसेच रोड मॉडेल व्हिलेज कमिटी स्थापन करण्यात आली.

या कार्यक्रम प्रसंगी शिरूर पंचायत समिती सदस्य आबासाहेब सरोदे, शिव पानंद शेत रस्ता चळवळीचे शरद पवळे, विजय शेलार, ॲड. सुप्रिया साकोरे, सुरेश वाळके, बापूराव, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष हिरामण सरोदे, उपाध्यक्ष कैलास सरोदे, उपसरपंच सोमनाथ सरोदे, ग्रामपंचायत सदस्य उमेश सरोदे, शिल्पा घावटे, विद्या सरोदे, सुरेखा निरवणे, मोनाली कर्डिले ग्रामस्तरीय कमिटीचे पंकज शेळके, विकास सोसायटीचे संचालक किशोर सरोदे, शिरूर मंडलाधिकारी फलके साहेब, तलाठी चौधरी मॅडम, माजी सरपंच कमल सरोदे, हनुमान सरोदे आदी ग्रामस्थ तसेच महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरदवाडी गावचे ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब बेंद्रे यांनी केले, तर आभार सरपंच लक्ष्मी बाळासाहेब जाधव यांनी मानले.